


मकर संक्रांत
पुष्प ४४
जानेवारी २०११, वर्ष ११ वे
सत्पंथ
प्रेरणा
जो सुख मिलता है राम भजनमें वो सुख नाही अमिरीमें ।
मन लागो मेरो यार फकिरीमें ।
realpatidar.com


realpatidar.com
मकर संक्रांत
पुष्प ४४
जानेवारी २०११, वर्ष ११ वे
सत्पंथ
प्रेरणा
जो सुख मिलता है राम भजनमें वो सुख नाही अमिरीमें ।
मन लागो मेरो यार फकिरीमें ।
realpatidar.com



फैजपूर येथे श्रीमद् दशावतार कथेप्रसंगी मार्गदर्शन करताना पूज्यश्री

फैजपूर येथे श्रीमद् दशावतार कथेप्रसंगी भाविक भक्त

पुण्यतिथी महोत्सवनिमित्त समाधी पुजन करताना संतगण

ब्रम्हलीन संतश्री जगन्नाथ महाराज यांच्या नवम पुण्यतिथी माहेत्सव प्रसंगी उपस्थित संत महात्मे व भाविक



सत्पंथ **प्रेरणा** त्रैमासिक

वर्ष ११ वे | मकर संक्रांत २०११ | पुष्प ४४

संस्थापक :
ब्र.प.पू. आचार्य श्री जगन्नाथ महाराज

संपादक :
आचार्य श्री जनार्दन महाराज

सल्लागार :
डॉ. श. रा. राणे

प्रकाशक :
सत्पंथ साहित्य प्रकाशन, फैजपूर
ता. यावल, जि. जळगाव - ४२५ ५०३
फोन नं. (०२५८५) २४५४१७
मोबाईल - ९४२२७७५६५५

Email - Satpanth@yahoo.com
om satpanth@gmail.com

मुद्रक व अक्षर जुळणी :
यशवंत प्रेस, फैजपूर
ता. यावल, जि. जळगाव
मोबा. ९४२१५१८१५८, ९९२२७८१७५५

वर्गणी :
वार्षिक - ६५ रुपये
त्रैवार्षिक - १६५ रुपये
पंचवार्षिक - ३०० रुपये
दशवार्षिक - ५०० रुपये

मूल्य १५ रुपये

संपादकीय.....!

प्रिय वाचको, सप्रेम जय गुरुदेव

सर्वे भवन्तु सुखिन: सर्वे सन्तु निरामया: ।
सर्वे भद्राणि पश्चन्तु मा कश्चिंद दु:खभाग्भवेत ।।

या अपेक्षेने सर्व संतांची मानव जातीच्या कल्याणासाठी अखंड धडपड सुरु असते. या महान संतांनी निर्माण केलेली आपली संस्कृती दगडात देव पाहणारी नसून सर्व प्राणिमात्रांत, चराचरात परमेश्वराला पाहणारी महान संस्कृती आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या अतिक्रमणामुळे व इतर दूषित घटकांमुळे ही निर्मळ संस्कृती प्रदूषित होत आहे. पण या सांस्कृतिक प्रदूषणाचां वावटळीतही संतांच्या निर्मल व लोकसमर्पित जीवन पुष्पाचा किर्तीपरिमल मूमूक्षांच्या, सज्जनांच्या भाववृत्ती प्रफुल्लित करतो. त्यांच्यात प्रेम, आपुलकी निर्माण करतो. कारण संतांचा विश्वास आहे की, विश्वशांती निर्माण करण्याचे महान कार्य केवळ समस्त प्राणिमात्रांवरील प्रेमभावातूनच शक्य आहे.

आपल्या सारख्या सुज्ञ, सज्जन वाचकांच्या मनातील आपुलकीचा अखंड झरा असाच खळखळत राहो, मन विश्वशांतीचे, संतांचे स्वप्न फार लांब नाही. मकर संक्रांतीच्या या शुभपर्वातील तिळाची स्निग्धता आणि गुळाचा गोडवा हा आपल्या सर्वांमधील जिव्हाळा वाढवत राहील यात तीळमात्र शंका नाही.

सांप्रदायिक कार्याच्या वाढत्या व्यापामुळे हा अंक आपल्या हाती देण्यास उशीर होत आहे.

''स्नेह जपावा, प्रेम जपावे, मनामनाचे अंतर न तुटावे, तिळगुळातून आपल्या जीवनात मधूर चांदणे बरसावे''.

जनार्दन महाराज

सतपंथ प्रेरणा अंतरंग....

भजन

उध्दार करो गुरुदेव । तुम्हारी शरण पडे ।
भवपार करो गुरुदेव । तुम्हारी शरण पडे ।
कैसा तेरा नाम धीयाये ।
कैसे तुमसे लगन लगाये ।
हृदयमे जगा दो ज्ञान । तुम्हारी शरण पडे ।।१।।
पंथ पंथ मतो की सुन बाते ।
द्वार तेरे-तक पहुच न पाते ।
भटके बीच जहान । तुम्हारी शरण पडे ।।२।।
तुम्ही हो जयराम-जगन्नाथ मोरारी ।
रामदास-जनार्दन त्रिपुरारी ।
तुम्ही बने गुरुदेव । तुम्हारी शरण पडे ।।३।।
ऐसी अंतर ज्योती जगाना ।
दीन दासीको शरणमे लेना ।
हे गुरु दयानिधान । तुम्हारी शरण पडे ।।४।।
उध्दार करो गुरुदेव । तुम्हारी शरण पडे ।
भवपार करो गुरुदेव । तुम्हारी शरण पडे ।

– श्रीमती बेबीताई भारंबे

भजन

ओ मेरे प्यारे गुरु जनमसे बिछडे गुरु
तुझपे मै कुर्बान
तुही मेरी जिंदगी तूही मेरी बंदगी
तूही मेरी जान ओ मेरे प्यारे गुरु
तुझपे मै कुर्बान
गुरु के आचलसे जो आये ऊन हवाओंको सलाम
गुरु के मुखसे निकली वाणी मेरा सत् सत् प्रणाम
कितनी प्यारी याद तेरी कितना प्यारा नाम
मैने मांगी तुझसे खुशिया तूने दिया आत्म आनंद
मैने सुनिया रोग से तुने मुझे निर्मल किया
इन अन किससे करू सब जगह है तेरी याद
ज्ञान दिपक सदा मन मेरा जगाता है
एक इच्छा ना रहे भावना बदली रहे
औरतो को कुछ भी नही बस रह गया है तेरा प्यार
ओ मेरे प्यारे गुरु तुझपे कुर्बान



अमृतवाणी

(श्री सद्‌गुरु इमामशाहांचे दोहे)

भ्रमणाये जग वही रह्या। अने भटकता भुलायेरे
जेणे साचा सतगुरु ना भेटीया। ते केमकरी अमर थायेरे ।।१४।।

संसार चक्राच्या, जन्ममरणरूप भ्रमणातच तू राहीलास तर त्यातच भ्रम पावून तू आत्मस्थितीपासून पराङमुख होशील असा दिव्य संदेश सद्‌गुरुंनी दिला. कारण की संसारातील सुख क्षणीक आहे, ते शाश्वत नाही. याचा अर्थ संसार करु नये किंवा जो संसारी आहे तो आत्मोन्नती करु शकत नाही असा होत नाही. परंतु किंमती असा मानव जन्म फक्त सांसारिक कर्मे करायला दिला नाही तर संसार करत असताना सुध्दा ब्रम्हांड आणि पिंडाचे निर्माण करणाऱ्या परमेश्वराची सेवा झाली पाहिजे.

ऐ पींड ब्रम्हांड जेणे सरजीया ।
तेणे केम विसरो गेमार ।।
गर्भवासनी दिधी वाचा पालजो ।
तो छुटे लक्ष चौर्याशीनो मार ।।

सद्‌गुरुंनी सांगितले की, सृष्टी निर्मात्या भगवंताला विसरुन चालणार नाही, भगवंताचे जे अनन्य उपकार आपल्यावर आहेत त्यांचे विस्मरण होता कामा नये. आपण ज्यावेळी गर्भवासात होतो, दुःखात होतो त्यावेळी भगवंताला शरण जाऊन प्रार्थना केली होती की, देवा येथून मला मूक्त कर, तू असे केल्यास मी तुला विसरणार नाही; परंतु या संसारात येताच आपण हळू हळू देवाला विसरतो. म्हणून सद्‌गुरुंनी आज्ञा केली की, तू दिलेले वचन पूर्ण कर, असे केल्यास तुझा लक्ष चौर्याशीचा फेरा चुकेल, तुला परमपदाची प्राप्ती होईल.

हे शिष्या, तू जर सांसारिक कर्मातच गढून राहीलास तर तूला योग्य अशा मार्गदर्शकाची, गुरुंची प्राप्ती होणार नाही व त्यांच्याकडून आत्मज्ञान प्राप्त न करु शकल्यामुळे तू अमर होऊ शकणार नाही.

"सुगरा होय सो भर भर पीये
नुगरा जाय प्यासा"

ज्याच्यांवर गुरुकृपा नाही त्यास आत्मज्ञान अथवा आत्मिकबळ प्राप्त न झाल्यामुळे तो जीव अधोगतीला जातो.

– भावार्थ : आचार्य श्री जनार्दन महाराज
सत्पंथ मंदीर संस्थान, फैजपूर

ॐ नमो निष्कलंकी नारायण जनार्दनाय। भस्मायुधाय विद्महे। दिव्यनेत्राय धीमहि। तन्नोज्वहरः प्रचोदयात्।। ॐ शांतिः शांतिः शांतिः

पतीची कर्तव्ये

श्री. श्रीराम विश्वनाथ गुजर
मु.पो.ता. नांदुरा , जि. बुलढाणा

एका लग्न झालेल्या स्त्रीने एका तरुण अविवाहित स्त्रीला प्रश्न विचारला, "तू लग्न का करत नाहीस?" त्या तरुणीने उत्तर दिले, "मी तीन नोकर पाळले आहेत. त्यापैकी एक पोपट आहे. त्याने शपथ घेण्याचे शिकले आहे. तो रोज म्हणतो, "मी शपथ पूर्वक सांगतो की, तुझ्याशिवाय मला कोणीही प्रिय नाही." तो पतीप्रमाणे दररोज शपथ घेतो.

माझा दुसरा नोकर बोका आहे. तो दिवसभर इकडे तिकडे भटकत असतो. खाण्याच्या वेळी मात्र बरोबर घरी येतो व खाणे झाले म्हणजे पुन्हा भटकण्यास जातो.

माझा तिसरा नोकर कुत्रा आहे. तो दिवसभर येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या अंगावर गुरगुरत असतो. त्याला वेळेवर खावयास दिले नाही तो माझ्यावर देखील गुरगुरतो.

लग्न झाल्यावर पती देखील हीच कामे करतो. तो निरनिराळ्या शपथा घेतो व मोडतो. खाण्याच्या वेळी बरोबर घरी येतो. पत्नीवर व तिच्या माहेरच्या लोकांवर गुरगुरतो. पतीची ही तिन्ही कामे माझे पाळीवप्राणी करतात. मग मी लग्न कशाला करु?"

लग्न झालेली स्त्री म्हणाली, "तू सांगितलेल्या कामाशिवाय आणखी तीन महत्त्वाची कामे पतीला करावी लागतात. १) पैसे कमविणे. २) घरात अन्न, वस्त्र व जीवनोपयोगी वस्तू आणणे आणि ३) संतती निर्माण करणे. तुझे पाळीव प्राणी यापैकी एकही काम करत नाही म्हणून तुला विवाह करणे आवश्यक आहे.

दिनदर्शिका २०११

मे	ऑगष्ट	फेब्रु. मार्च नोव्हें.	जून	सप्टें. डिसें.	एप्रिल जुलै	जाने. आक्टो.	दिनदर्शिका सन २०११				
रवि	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	१	८	१५	२२	२९
सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	२	९	१६	२३	३०
मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	सोम	३	१०	१७	२४	३१
बुध	गुरु	शुक्र	शनि	रवि	सोम	मंगळ	४	११	१८	२५	स
गुरु	शुक्र	शनि	रवि	सोम	मंगळ	बुध	५	१२	१९	२६	त्
शुक्र	शनि	रवि	सोम	मंगळ	बुध	गुरु	६	१३	२०	२७	पं
शनि	रवि	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	७	१४	२१	२८	थ

प्रथम महिना, त्याखालील वार
नंतर त्या समोरील तारीख पाहावी

श्री. नरहर अवचित झांबरे (गुरुजी)
फैजपूर

ॐ नमो निष्कलंकी नारायण जनार्दनाय। भस्मायुधाय विद्महे। दिव्यनेत्राय धीमहि। तन्नोज्वहरः प्रचोदयात्।। ॐ शांतिः शांतिः शांतिः

श्री गुरुचरणतीर्थामृत

- प्रा. मुखीश्री उल्हास कौतिक बोरोले
धुळे

सद्‌गुरु कसा ओळखावा?

जीवनामध्ये मानवी व्यवहारात प्रत्येकाला सुख हवे असते. उत्कृष्ट भक्तिने सद्‌गुरु ओळखता येतो. त्यासाठी साधकाने रजो तमो गुणांचा नाश करुन सद्‌गुरुस शरण जावे. त्यामुळे साधक सत्वगुणी होतो. सद्‌गुरु अशा साधकावर कृपा दृष्टी करतात कारण ते दोघेही त्यावेळी सत्वगुणी असतात. साधकाने भक्ति करावी. **'भक्ति म्हणजे पदैक्य युक्ती'**. सद्‌गुरु कृपेने आत्मज्ञान प्राप्ती होते. नवविधा भक्तिपैकी कोणत्याही भक्तिने स्वभाववृत्ती जोपासावी, शरण्य भाव स्विकारावा म्हणजे सद्‌गुरु कृपा होते. परमार्थ लाभतो. 'जड जीवाचा उध्दारकर्ता तोचि सद्‌गुरु'. सद्‌गुरुचे वर्णन शब्दाने करीत असतांना शब्द आपोआप सद्‌गुरुमय होतात. त्यांच्या दर्शनाने नित्यनुतन आनंद मिळतो. **''म्हणूनि त्याच पदी नमावे''** म्हणून सद्‌गुरुंची उपासना करणे आवश्यक.

उपासना म्हणजे काय? ती कशी करावी?

भारतीय संस्कृतीत उपासनेला महत्व आहे. उपासना म्हणजे उपास्य शक्तीच्या जवळ (उप) आसनाची (बसण्याची) स्थीर होण्याची युक्ती होय. हे ''जवळ बसणे'' शरीराने नसून मनाने देवाजवळ/गुरुजवळ बसावयाचे आहे. उपास्य शक्तिच्या जवळ बसतांना मन स्थीर नसेल तर त्याचा उपयोग नाही. उपासना ही मानसिक क्रिया आहे. शारीरिक नव्हे. उपासनेने 'ज्ञान' होण्याची पात्रता निर्माण केली जाते. उपासना पद्धत शिस्तबध्द व्हावी, आनंददायी व्हावी यासाठी काही नियम दिलेले आहे. ते पाळण्यासाठी श्रध्दा व मनाची एकाग्रता हवी. त्यासाठी चरण पादुका/ गुरुपादुकाची योग्य शास्त्रोक्त पद्धतीने पूजन करणे आवश्यक आहे. परमेश्वराला तसेच गुरुला सगुण स्वरुपात पूजन फार प्रिय असते. म्हणून ज्याच्या मनात सद्‌गुरु सेवेची आर्तता, उत्सुकता, प्रेम आहे, त्या प्रत्येकाला गुरु पादुका पुजनाचा अधिकार आहे. त्यासाठी मात्र श्रध्दा-भक्ती निरपेक्ष हवी. ''निष्काम'' उपासना (केवळ मुलीसाठी केलेली) असावी.

पादुकांचा तंत्रशास्त्रीय विधी :-

गुरु पादुकाचे / चरण पादुकाचे तंत्र शास्त्रीय ध्यान व मंत्र साधना याचे वर्णन करतांना न्यायरत्न धुंडिराज शास्त्री विनोद म्हणतात 'ऋं ऋं टम् मूर्धास्थाने' या मंत्राचा उच्चार करुन करंगळी जवळील 'अनामिका' या बोटाने डोक्याच्या मध्यभागी स्पर्श करावा असे सातवेळा करावे. त्यानंतर 'सातचे माझे नमन । सहस्त्रदळी स्फटिक वर्ण । परात्पर परिपूर्ण । श्री गुरुपीठ ।' ही ओळ सातवेळा म्हणावी नंतर एक निरंजन लावावे. ही निरांजन ज्योत आपल्या दोन भुवयामध्ये आहे अशी कल्पना करावी. हळूहळू भुवया, कपाळ व आपण स्वत: नाहिसे होतो व नुसती ज्योती मात्र भासु लागते. ही ज्योती ब्रह्मरंध्रात म्हणजे डोक्याच्या मध्यभागी स्थिर राहते. नंतर त्या ज्योतीचे दोन भाग होतात. प्रथम चंद्रबिंब तयार होते व त्याच्या शेजारीच सूर्य बिंब हे दोन्ही बिबे म्हणजे ''श्रीगुरुचरण'' चंद्रबिंब व उजवा चरण = सूर्य बिंब ब्रह्मरंध्रातील शुभ्रकमल त्या पादुकांच्या अध:स्थळी कल्पिले म्हणजे दोन पावले एक झाल्याची साक्ष होय.

*** चरण, गुरुपादुका, चरण पादुकाचा अर्थ काय?**

चरण - चर या धातूपासून 'अण' प्रत्ययान्त हा

शब्द आहे. याचा अर्थ हिंडणे, फिरणे, गमन करणे, ज्याद्वारे प्राण्याला फिरता येते ते चरण/पाय होत.

संस्कृतीसाठी, परमेश्वरासाठी झिजलेल्या सतुपुरुषाचे संताचे, सतुगुरुंचे चरण हे पवित्र असतात कारण सतुपुरुष, संत सतुगुरु इतरांचा तापत्रय दूर करण्यासाठी, दुःखिताचे दुःख दूर करण्यासाठी, दुसऱ्याचे दुःख घेण्यासाठी सातत्याने आपल्या चरणाचा वापर करतात म्हणून ते चरण पवित्र आहे. त्या चरणातील पादुका या ''चरण पादुका'', त्याही पवित्र असतात.

सर्व साधारण माणसाच्या चालण्यासाठी वापरला जाणारा अवयवाला ''पाय'' म्हणतात हे पाय स्वतःच्या स्वार्थासाठी, चरितार्थासाठी भ्रमण करतात. मात्र संताच्या, सत्पुरुषांच्या सतुगुरुंच्या चरण कमलद्वारे नाना तीर्थ यात्रा करून दुसऱ्याचे दुःख दूर करण्यासाठी इतरांच्या उध्दारासाठी त्याचा लाभ होतो म्हणून त्याला ''चरण'' म्हटले जाते. म्हणून लोक या 'पवित्र चरण कमलाचे' पूजन, अर्चन, स्मरण करतात व आपले दुःख दूर करतात. ज्यावेळी 'चरण' उपलब्ध नसतील त्यावेळी या चरण कमलांनी धारण केलेल्या पादुका ''चरण पादुका'' पवित्र मानून त्याचे पूजन भक्तिभावाने करतात. उदा. रामायणात भरताने श्रीरामाच्या चरण पादुका माथी घेऊन त्यांची विधिवत स्थापना करुन राज्यकारभार १४ वर्षे चालविला, श्री रामदास स्वामींच्या पादुका शिवाजी महाराजांनी स्विकारुन त्याचे पूजन केले आहे

गुरुपादुका

गु – गकार, गुणातीत
रु – रुकार, पापस्य दाहकः
गुणांच्या पलिकडे असणारे गुरु,
पापाचा नाश करणारे गुरु
त्यांच्या पादुका-गुरुपादुका

चरण पादुका

च – चित्त शुद्ध करणाऱ्या
र – रक्षण करणाऱ्या
ण – नित्य आनंद
देणाऱ्या चित्तशुद्ध करणाऱ्या,
रक्षण करणाऱ्या, नित्य आनंद देणाऱ्या
गुरुंच्या पादुका त्या पादुका
''चरण पादुका''

''जगाच्या कल्याणा संताच्या विभूती । देह कष्यविती नाना उपकारे'' हे ब्रीद संताचे आहे. म्हणून अशा संताच्या, गुरुंच्या चरण पादुकाचे पुजन 'अंतकरण असता पवित्र। नित्य स्मरावे चरण पवित्र।'' असे म्हटले आहे.

या पादुकांना ''निर्गुण पादुका'' तसेच ''निर्लेप पादुका'' ही म्हणतात.

१) निर्गुण पादुका : षड्रिपूंच्या पलिकडे गेलेल्या व दैवी गुण असलेल्या पादुका म्हणजे ''निर्गुण पादुका'' शिव स्वरुपात ही शक्ती असल्याने, त्या शक्तीने अघटित घटना घडत असतात याची प्रचिती साधकाला येते.

२) निर्लेप पादुका : ज्या पादुकावर कसलाही लेप राहत नाही व तो आपोआप निघून जातो. घट्ट चिकटून राहात नाही. पादुकावर लावलेले केसर कोरडे पडते फुगून वर येते व निघून पडते.

पादुका हे अव्यक्त रुप असले तरी तेजोमय रुप आहे. ही प्रचंड शक्ति शिवस्वरुप आहे. ती साऱ्या विश्वात व्यापून आहे. चरण दर्शनाने विनम्र भाव येतो. दर्शन व आशिर्वाद एकाच वेळेला प्राप्त होतात. विनम्र भाव उत्पन्न झाल्यावरच आशीर्वाद प्राप्ती होते. ज्यांची श्रध्दा ज्या प्रकारची त्या प्रकारचे फळ त्याला मिळते.

✽ गुरु चरण हेच तीर्थक्षेत्र

"गुरुचरण" सेवेचे महत्त्व : गुरुचरण सेवा ही ६८ तीर्थक्षेत्री घडणाऱ्या पुण्यप्रद स्नानाइतकी महत्त्वाची मानली आहे. ज्ञानेश्वरीत "संतचरण हेच तीर्थक्षेत्र आहे" असे म्हटले आहे. गुरुचरित्रात तर "सर्व तीर्थक्षेत्रे एका गुरुचरणापाशीच असून गुरुसेवा करावी" असे उपदेशिले आहे.

सद्गुरु इमामशाहांनी म्हटले आहे.

१) एक बुंद पाऊळ तणो । सप्त समुद्र नही तोल ।।
२) आनंद मंगल करु आरती । हरी गुरु संतनी सेवा ।।
अडुसठ तिरथ संतने चरणे । गंगा जमुना रेवा ।।
३) माझी देव पुजा । माझी देव पुजा । पाय तुझे गुरुराया ।।

तीर्थक्षेत्री स्नान केल्याने शरीरशुद्धी होते, पण सद्गुरुच्या सान्निध्यात राहून उपासना केली तर शरीरशुद्धी बरोबर मन आणि बुध्दी याची शुद्धी होते, मन पवित्र होते. बुद्धी तल्लख होते. विवेक दृष्टी वा विवेक बुद्धी हे मन व बुद्धी याचे शुद्धीचे प्रतिक मानले जाते. माणसाची वृत्ती पालट घडविण्याचे कार्य गुरुचरण उपासनेद्वारे चालते. सद्गुरुंच्या मार्गदर्शनाने मोक्षप्राप्ती होते. गुरुच्या ऋणातून मुक्त होणे अशक्य म्हणून त्यांच्या चरणी माथा ठेवणे योग्यच आहे. म्हणून एकनाथी भागवतात म्हटले आहे -

"ज्याचे घेता चरण तीर्थ ।
ते चारी मुक्ती पवित्र होत ।।" ए. भा. ९-४४४

जन्म मरणाचा फेरा चुकविण्यासाठी व मोक्षप्राप्तीसाठी सद्गुरुंच्या चरणावर अनन्य भावाने शरण जाणे म्हणजे "पादसेवन भक्ती" होय. काया, वाचा, मनाने सद्गुरुंचे पाय सद्गतीसाठी सेवणे यालाच "पादसेवन भक्ती" म्हणतात, म्हणून म्हटले आहे.

ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे ।
त्या त्या ठिकाणी निज रुप तुझे ।।
मी ठेवितो मस्तक त्या ठिकाणी ।
तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही ।।

✽ "चरणपादुका" पुजनाचे महत्त्व काय?

एखाद्या पादुकांना दररोज नियमित वेळी स्पर्श करीत गेल्यास काही काळाने त्या पादुकामध्ये, गुरु नेमक्या स्पर्श समयी आपल्यासाठी जागृत होतात व संवेदनशील होतात अशा वेळी साधकास त्याच्या विकासासाठी लाभ होतो, त्याची प्रगती होते. एखाद्या साधनाच्या ठिकाणी (पादुकाच्या ठिकाणी) नियमित आपले मस्तक ठेवणाऱ्या साधकाची इच्छाशक्ती अधिकाअधिक तीव्र होते त्याला मनोकामना पूर्तीचे विलक्षण अनुभव येवू लागतात.

दररोज ठराविक वेळी देवपूजा करणाऱ्या साधकास चरण पादुका पूजेनंतर अल्पकाळात "पार्थिवपूजा" सिद्ध होते. नियमितवेळी पार्थिव पूजा करणारा साधक काही वर्षात उत्कृष्ट व प्रभावी "मानसपूजा" करु शकतो. नियमित मानसपूजा करणारा साधक "ओंकार साधने" कडे कधी वळतो ते त्यालाच कळत नाही. कालांतराने शरीराच्या या नियमित हालचालीचे रुपांतर प्रतिक्षिप्त क्रियेमध्ये होते त्याची नोंद मोठ्या मेंदू ऐवजी लहान मेंदूत होते. अशा रितीने या पूजेत नुसता यांत्रिकपणा न राहाता मनन, चिंतन, चित्ताची एकाग्रता, कुटस्थानावर केंद्रिकरण, ओंकारश्रवण, सोहं जप इ. क्रिया मोठ्या वा लहान मेंदूलाच नव्हे तर सर्व शरीरातील पेशीवर इष्ट बदल घडवून आणतात.

✽ चरण पादुकामध्ये गुरुत्व/देवत्व कसे येते?

सगुण गुरुद्वारा निर्गुण परमेश्वराशी संबंध साधता येतो. म्हणून सद्गुरु असणे आवश्यक आहे. चराचरामध्ये परमेश्वर आहे तो मूर्तीमध्ये, पादुकामध्येही असतो यात संशय नाही. माणसाने पाहणे गरजेचे आहे. सगुण पादुकामध्ये गुरुत्व/परमेश्वर त्यासाठी अशावेळी मनाचे, नेत्राचे एकाग्र लक्ष होण्यासाठी मूर्ती / फोटो / चरण पादुका शिवाय गत्यंतर नाही. त्यामुळे साधकात गुरुविषयी, देवाविषयी जाण वा

दखल जागृत होते. साधक त्या पादुकाकडे (मूर्तीकडे) सारखा पहात राहातो. त्यामुळे त्याला त्या गुरुचा जप/देवाचा जप करावासा वाटतो. मनात गुरुचे, देवाचे चरित्र घोळत राहते. ही स्थिती ती पादुका वा मूर्ती निर्जीव, चेतनाहीन असतांना असते अशा मूर्तीत वा पादुकातून स्पंदने, लहरी बाहेर पडू लागल्यावर मोठा परिणाम होऊ शकतो. ही स्पंदने, लहरी, बाहेर पडण्यासाठी त्या पादुकांमध्ये वा मूर्तीमध्ये काही संस्कार होणे आवश्यक असते. मनाने त्या मूर्तीच्या वा पादुकांच्या सहवासात साधकाचे वास्तव्य घडले की आपोआप त्या मूर्तीमध्ये वा पादुकामध्ये देवत्व जागृत होऊ लागते. प्राणप्रतिष्ठा केलेली मूर्ती वा पादुका काही दिवसांनी दृष्टांत देऊ लागते. प्राणप्रतिष्ठेचा पूर्ण विधी माहित नसतांनाही साध्या समंत्रक, अमंत्रक षोडशोपचार व पंचोपचार पूजा करून अभिषेक करून त्या पादुकांत वा मूर्तींत देवत्व येवू शकते. वरचेवर पंचामृत अभिषेक, उद्वार्जन (लिंबू भस्म लावून मूर्ती प्रतिमा वा पादुका स्वच्छ करणे) आरती, नवरात्र विधी इ. सोपस्कारांनी त्यात देवत्व सिध्द होऊन घरातील वातावरण प्रसन्न होते.

*** अभिषेक म्हणजे काय? तो कसा करावा?**

अभिषेक याचा अर्थ एखाद्या मूर्तीवर / पादुकावर जल, दुध, रस, तैल, पंचामृत इ.पातळ वस्तू सतत मंत्राने सिंचन करीत राहाणे. मंत्रघोष होत असतांना निर्माण होणाऱ्या स्पंदनामुळे अभिमंत्रित झालेले पाणी पादुकावर / मूर्तीवर पडत राहिल्याने त्यात देवत्व अधिकाधीक जागृत होते व इच्छित फल प्राप्ती होते. त्यासाठी धातूचे अभिषेक पात्र यंत्र वापरणे योग्य ठरते. या यांत्रिकतेमुळे, जडत्वामुळे फल प्राप्ती उशीरा होते. त्यासाठी साधकाने एकाग्रचित्ताने मंत्र घोष चालू असतांना आपल्या हाताने पळीने / चमच्याने अभिषेक केला तरी चालतो. काही वेळेला शिवासाठी गव्याचे शिंग, शंख विष्णुसाठी, तांब्याचे पात्र गणपतीसाठी अभिषेकासाठी वापरतात. दूध वा तेलाचा अभिषेक करतांना शंख, शिंग, तांब्याचे पात्र वापरु नये तर त्यावेळी काशाचे / पितळ / चांदीचे भांडे वापरावे. रसाचा अभिषेकासाठी न कळकणारे भांडे वापरावे.

सूर्य व देवीला पाण्याचा, विष्णु व गणपतीला दुधाचा, शिवाला उसाच्या रसाचा, शनिला तेलाचा अभिषेक करतात. सर्व देवांना / पादुकांना पाण्याचा किंवा दूध+किंवा मिश्रणाचा अभिषेक चालतो. पाण्याव्यतिरिक्त इतर पदार्थांचा अभिषेक झाल्यावर पादुका / देव स्वच्छ पाण्याने धुवावेत. अभिषेक झाल्यावर अत्तर लावून उष्णोदक घालावे त्यानंतर परत थंड पाणी घालू नये. अभिषेक झाल्यावर पादुकाची / मूर्तीची गंध, अक्षता, दिवा, ज्योत, धुप वाहून पुजा करावी.

गुरुचरण तीर्थ तीर्थ ग्रहण करण्याचा विधी व त्याचे संकेत वा प्रथा, तीर्थाचे प्रकार कोणते?

श्रेष्ठ व्यक्तिविषयी थोर आदरभाव त्याच्या पायावर डोके ठेवून दर्शविला जातो. श्रेष्ठ, सत्पुरुषाची, गुरुची सारी भक्ती त्याच्या चरणात एकवटलेली असते. त्याच्या चरण-स्पर्शाने ती शक्ती स्पर्श करणाऱ्या व्यक्तिच्या शरीरात विजेसारखी संक्रमित होते.

गुरुचरणाच्या सेवेतून साधकाचे अंतकरण शुद्ध होते. गुरुचरण शुद्ध जलाने प्रक्षालन करून पात्रात जमविलेले "चरणतीर्थजल" मस्तकावर घेतले अथवा ग्रहण केले तर ६८ तीर्थामध्ये स्नान केल्याचे फळ साधकास प्राप्त होते. अंत:करण पाप मुक्त होऊन शुद्ध होते. म्हणून गुरुचरण तीर्थ पापहारक असून ज्ञानरुपी तेज उज्वल करणारे आहे, ते ज्ञान वैराग्य प्राप्त करून देणारे आहे. श्री गुरुच्या चरणाचे तीर्थाचे महत्त्व "गुरुगीतेत" दिले आहे -

१) सप्तसिंधु अनेक तीर्थी । स्नाने पाने जे फल प्राप्ती ।

एक बिंदूसम न पवती । सद्गुरु चरण तीर्थाच्या ।। ४४ ।।

२) सप्त सागर पर्यंत - तीर्थस्नानादिक फलम् ।
गुरोरंघ्रिपयो बिंदू सहस्त्रांशे न दुर्लभम् ।। ७८ ।।

शिक्षापत्रीमध्ये गुरु इमामशाहांनी म्हटले आहे -

१) ध्यानमूलं गुरोःमूर्ती, पूजामूलं गुरोःपदम् ।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं, मोक्षमूलं गुरोःकृपा ।। ७६ ।।

२) अष्टोतरशत तीर्थाचा महिमा ।
तवपादपद्मी वसतसे गरीमा ।।
द्वादश कळांचा अर्क तव शरीरा ।
कल्पतरूहूनी श्रेष्ठ तूं ।। ६४ ।।

तीर्थग्रहण करण्याच्यावेळी कोणतेही तीर्थ पुजारी साधकास देत असेल त्यावेळी ते तीर्थ उजव्या हातात घेतांना "गोकर्णमुद्रा"करावी. (अंगठ्यापाशी तर्जनी - अंगठ्या जवळचे बोट - किंचित वाकवून तिच्या पृष्ठावर एकामागे एक अशी बाकीची तीन बोटे ठेवावीत - यालाच "गोकर्ण मुद्रा" म्हणतात) व नंतर तळहाताच्या पसरट भागावरून तीर्थ ग्रहण करावे.

तीर्थाचे पाच प्रकार आहेत.

१) अग्नितीर्थ - आपल्या उजव्या हातात मध्यभागी

२) देवतीर्थ - आपल्या उजव्या हाताच्या मध्यमेच्या मुळाशी

३) पितृतीर्थ - आपल्या उजव्या हाताच्या अंगठ्याजवळ

४) ऋषीतीर्थ - आपल्या उजव्या हाताच्या विरुध्द बाजूस करंगळीकडे

५) आत्मतीर्थ - आपल्या उजव्या हाताच्या मनगटाजवळ

देवतीर्थाने देवतार्पण दान संकल्प करतात. पितृतीर्थाने पितृतर्पण करतात. ऋषीतीर्थाने ऋषीतर्पण करतात. अग्नीतीर्थावर पुरोहित लोकांनी दान दक्षिणा व संभावना घ्यावी. साधकाने देवाचे तीर्थ प्रथम अग्नितीर्थावर म्हणजे तळहाताच्या खोलगट भागावर घेऊन ते आत्मतीर्थ तोंडाचा आवाज न करता प्राशन करावे.

तीर्थग्रहण कितीदा करावे याचे संकेत आहेत. तीर्थ म्हणून घेतले जाणारे उदक / पंचामृतयुक्त उदक कमीत कमी (एक दोन थेंबही चालते) घ्यावे. सामान्यतः घरातील पूजा केल्यावर दोनदा तीर्थग्रहण करावे. ज्या दिवशी अन्नग्रहण होणार नसेल तर तीनदा तीर्थ ग्रहण करावे. मंदिरात गेल्यावर एकदाच तीर्थ घ्यावे. साधन एकादशीचे व्रत असल्यास साधक कडकडीत उपवास करुन दुसरे दिवशी सूर्योदयास तीर्थ घेऊन उपवास सोडतात. घरात नैमित्तीक सत्यनारायण पूजा, श्राध्द असेल तर नित्य पूजेनंतर तीर्थ न घेता महापूजा / श्राध्द झाल्यावर भोजनापूर्वी तीर्थ घ्यावे त्यामुळे देव गौरव / पितृ गौरव साधला जातो. नित्यपूजेचे तीर्थ एका चांगला स्वच्छ झारीत भरून ठेवावे व दिवसभरात योग्य समयी घ्यावे. पंचामृत तीर्थ संध्याकाळ पर्यंत ठेवू नये कारण ते लवकरच दुषित होते. देवतीर्थ व चरणतीर्थ घेतल्यावर हात डोक्याला / मस्तकाला फिरविण्याची प्रथा आहे. त्यामुळे देव / गुरु पादुका व तीर्थाचा गौरव व्यक्त होतो. मात्र पंचामृताच्या तीर्थावेळीही ही कृती करु नये.

तीर्थग्रहण करतेवेळी :

१) शंखमध्ये स्थितं तोयं भ्रामितं "अमुको" परी ।
अंगलग्नं मनुष्यणां महापापं व्यपोहति ।।

२) अकालमृत्युहरणं सर्वव्याधिकविनाशम्। "अमुक" पादोदकं तीर्थ जठरे धारयाम्यहम्।।

शंखोदक न घेता पळीने तीर्थ घेतांना फक्त दुसरा मंत्र म्हणावा. "अमुक" या पदाऐवजी पहिल्या मंत्रात त्या त्या देवाचे / गुरुचे नाव घ्यावे. उदा. केशवोपरी, गणेशोपरी, इमामशहापरी इ. दुसऱ्या मंत्रात 'अमुक' पदाऐवजी विष्णुपादोदकं, शिवपादोदकं, गजानन पादोदकं इ. रचना करावी. अभिषेकाच्यावेळी ताम्हण साधकापासून किमान एकवीतभर दूर असावे कारण पूजाकर्त्याचे मुखातील लाळेचे थेंब उडण्याची शक्यता असते. तीर्थात रुद्राक्ष ठेवल्यास हृदयरोग परीहार म्हणून

त्याचा उपयोग होतो.

* गुरुपादुकांचे अर्चन करण्याची कृती : शुद्ध स्नान करून वा हातपाय चेहरा स्वच्छ धुवून चुळ भरून सकाळी वा संध्याकाळी आपल्या सोयीनुसार आसनावर साधे, स्वच्छ, शुद्ध, वस्त्र परिधान करुन एकाग्र चित्ताने बसावे. सुरुवातीस पूजेची सर्व पूर्व तयारी करुन ठेवावी.

साहित्य : गुरुचरण पादुका, ताम्हण, तांब्यात पाणी, पंचपळी पात्र, अभिषेक पात्र, अत्तर, गंध, अक्षता, फुले, कापसाचे वस्त्र, दुध व पाणी याचे मिश्रण, प्रसाद इ. साहित्य मांडून ठेवावे.

नंतर गुरुचे ध्यान करावे मनात म्हणावे :

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।

गुरुसाक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः ।।

पुढील कृती करतांना २ वेळा पळीने प्रत्येकवेळी पाणी घालावे व म्हणावे व तशी कृती करावी.

ॐ श्री गुरुचरणारविदभ्यां नमः। अर्घ्यं अर्पयामि।
ॐ श्री गुरुचरण कमलेभ्यो नमः। पंचामृत अर्पयामि।
ॐ श्री गुरुपद कमलेभ्यो नमः। शुद्ध जलम् अर्पयामि।
ॐ श्री गुरुचरण पादुकाभ्यां नमः। सुगंधित द्रव्यं अर्पयामि।
ॐ श्री गुरुचरण तीर्थोभ्यो नमः। उष्णोदकम् अर्पयामि।
(पळीत पाणी गरम करुन वाहावे)
ॐ श्री गुरुचरणकमलेभ्यो नमः। अभिषेकं अर्पयामि।
ॐ श्री गुरुचरणार विदाभ्यां नमः । वस्त्रं अर्पयामि।
ॐ श्री गुरुचरणार विदाभ्यां नमः । चंदनं अर्पयामि।
ॐ श्री गुरुचरणार विदाभ्यां नमः । पुष्पम् अर्पयामि।
ॐ श्री गुरुचरणार विदाभ्यां नमः । तुलसी पत्रं अर्पयामि।
ॐ श्री गुरुचरणार विदाभ्यां नमः । धूपम अघ्रापयामि।
ॐ श्री गुरुचरणार विदाभ्यां नमः । दीपम् अघ्रापयामि।
ॐ श्री गुरुचरणार विदाभ्यां नमः । फलम् अर्पयामि।
ॐ श्री गुरुचरणार विदाभ्यां नमः । अक्षतां अर्पयामि।
ॐ श्री गुरुचरणार विदाभ्यां नमः । शुद्धोदकं अर्पयामि।
ॐ श्री गुरुचरणार विदाभ्यां नमः । नैवेद्यं अर्पयामि।

(नैवेद्य अर्पण करतांना म्हणावे.)

यानंतर गुरुची आरती, पुष्पांजली म्हणावी नंतर -

मंत्रहिनं क्रियाहिनं भक्तिहिनं सुरेश्वरः।

यत्पूजितं मयादेवः परिपूर्णं तद् अस्तु मे।।

जय गुरुदेव । जय गुरुदेव । जय गुरुदेव ।

कृति : प्रथम चरण पादुका स्वच्छ पाण्याने ताम्हणात धुवाव्यात. ते पाणी फेकून द्यावे नंतर ताम्हणांत त्या चरण पादुका ठेवून त्यावर दुधाच्या धारेचा अभिषेक करावा. नंतर शुद्ध पाण्याच्या धारेचा अभिषेक करावा. त्यावेळी खालील "अपवित्रने पवित्र करवानो मंत्र" म्हणावा.

मंत्र १) "अपवित्रने पवित्र करवानो मंत्र" :-

मंत्र १ : ॐ परमकृपाळू परमात्मानी कृपाथी आदरुं छु जे सदाये दयाळू छे ॐ नमो श्री सद्गुरु पात्र इंद्र इमामशाह आद्यविष्णु निरंजन निष्कलंकी नारायण तमारी आशिषे।

स्वामी तमे पवित्र, पवन पाणी पवित्र, धरती पवित्र, आकाश पवित्र, चंद्र सूर्य पवित्र, सात समुद्र पवित्र, अष्टकुळ पर्वत पवित्र, नवकुळ नाग पवित्र, तन पवित्र, मन पवित्र, पाच करोडी प्रल्हाद पवित्र, सात करोडी हरिचंद्र पवित्र, नव करोडी युधिष्ठिर पवित्र, जनिया, सतिया पवित्र, पंचायतन पवित्र, प्रभु तमारा नाम थी आ दास पवित्र ।

सद्गुरु श्री इमामशाह ॐ श्री निष्कलंकी नारायणे नमो नमः।।

यानंतर चरण पादुका पांढऱ्या स्वच्छ रुमालाने वा नॅपकिनने साफ कराव्यात. दूध+पाणी मिश्रीत चरण तीर्थ प्राशन करून उरलेले चरणतीर्थ तुळशीस पूजेनंतर समर्पित करावे. नंतर ताम्हणात चरण पादुका ठेवून खालील क्रिया करावी

धूप, उदबत्ती ओवाळावी - मंत्र २ : "उद्धूप लोभान मुकवानो मंत्र" :

ॐ परमकृपाळू परमात्मानी कृपाथी आदरुं छु जे सदाये दयाळू छे ॐ नमो श्री सद्गुरु पात्र इंद्र इमामशाह

आद्यविष्णु निरंजन निष्कलंकी नारायण तमारी आशिषे। धूप जले, अगर जले, लोभान जले, भवनी पीडा टळे, देव जागे, दैत्य भागे, जहाँ धूप, वहाँ रुप, जहाँ देव, वहाँ पूजा अलेख निरंजन निराकार हमारा देव नही दुजा। सद्गुरु श्री इमामशाह ॐ श्री निष्कलंकी नारायणे नमो नमः।।

दीप दाखववा, ओवाळावा-मंत्र ३ : "दिवा ज्योतने प्रगटावी प्रणाम करवानो मंत्र" :

ॐ परमकृपाळू परमात्मानी कृपाथी आदरुं छु जे सदाये दयाळू छे ॐ नमो श्री सद्गुरु पात्र इंद्र इमामशाह आद्यविष्णु निरंजन निष्कलंकी नारायण तमारी आशिषे। गुरु दिवो, गुरु देवता, गुरु विना घोर अंधार, गुरुविना युक्ती नाही, गुरुविना मुक्ती नाही, मन ताळू, गुरुमंत्र कुंची खोलो धर्मद्वार, तरीयो भवसागर पार, जागे ज्योत, भागे छोत,

सद्गुरु श्री इमामशाह ॐ श्री निष्कलंकी नारायणे नमो नमः।।

ॐ श्री गुरुचरण पादुकाभ्यां नमः । विर्लेपनार्थे चंदनं समर्पयामि ।

ॐ श्री गुरुचरण कमलेभ्यो नमः । लंकारार्थे अक्षतां समर्पयामि ।

ॐ श्री गुरुपदकमलोभ्यो नमः । पुजार्थे पुष्पं समर्पयामि ।

ॐ श्री गुरुचरणार विदाभ्यां नमः । नैवेद्यार्थ यथाशक्ति नैवेद्यं समर्पयामि ।

ॐ प्राणाय स्वाहा। ॐ अपनाय स्वाहा। ॐ व्यानाय स्वाहा। ॐ उदानायस्वाहा।

ॐ समानाय स्वाहा। ॐ ब्रह्मणे स्वाहा। नैवेद्यंमध्ये पानीयं अर्पयामि।

उत्तर पोशनं समर्पयामि। हस्त प्रक्षालनं समर्पयामि। मुख प्रक्षालनं सर्मपयामि।

(तीन वेळा ताम्हनात पाणी सोडावे.)

आशीर्वादाचा मंत्र : ४

ॐ परमकृपाळू परमात्मानी कृपाथी आदरुं छु जे सदाये दयाळू छे ॐ नमो श्री सद्गुरु पात्र इंद्र इमामशाह आद्यविष्णु निरंजन निष्कलंकी नारायण तमारी आशिषे। स्वामी तमे आद्य अंतना धणी श्री निष्कलंकी नारायण जंबूद्विपना धणी, विष्णु नारायण विष्णुना आधार, वेदना वसुमना आधार, सृष्टीना सर्जनहार, जंबुद्विपे गुरुनरे धर्या अवतार, सद्गुरु इमामशाह तमारा आ सेवक उपर स्नेहनी दृष्टी राखो, इमान, श्रद्धा, भक्ति कायम राखो, नीतिनियम अखंड राखो, क्रिया कर्ममा ना चुकावसो, तमारा चरणना प्रतापे ये जीवने, सुखशांती आपो, त्रिविध ताप निवारो, सेवकना दुःख दारिद्रा दूर करो, जेणे सत्पंथ देखाड्या तेना ऐकोत्तरसो पीढीया तारो। सद्गुरु श्री इमामशाह ॐ श्री निष्कलंकी नारायणे नमो नमः।।

नंतर या पादुका देवघरात प्रतिष्ठापित कराव्यात. गुरुपौर्णिमा, गुरुवार रोजी या पद्धतीनेच पादुकांवर अभिषेक करावा. या संदर्भातील काही श्लोक चरण खालील प्रमाणे आहेत.

श्री गुरुगीता (श्री रंगनाथ स्वामीकृत मराठी) संदर्भ गुरुकृपायोग-पा.क्र. ३८-३९

गुरु : १) सप्तसिंधु अनेक तीर्थी ।
स्नाने पाने जे फल प्राप्ती ।
एक बिंदूसम न पवती ।
सद्गुरु चरण तीर्थाच्या ।। ४४ ।।

२) सप्त सागर पर्यंत - तीर्थस्नानादिक फलम् ।
गुरोरंध्रिपयो बिंदू सहस्रांशे न दुर्लभम् ।। ७८ ।।

शिष्य : ३) गुरुचरणतीर्थ प्राशन। गुरुआज्ञा उच्छिष्टभोजन।
गुरुमूर्तीचे अंतरी ध्यान। गुरुमंत्र वदनी जपे सदा।।१८।।
गुरोःपादोदकं पीत्वा गुरोरुच्छिष्टभोजनम्।
गुरुमूर्तेः सदाध्यानं गुरुमंत्रं सदा जपने।।१५।।

४) ध्यानमुलं गुरुराय। पूजामूल गुरुपाय।
मंत्रमूलं निःसंशय। मोक्षमूल गुरुकृपा।।४३।।
ध्यानमूलं गुरोःमूर्ती, पूजामूलं गुरोःपदम् ।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं, मोक्षमूलं गुरोःकृपा ।। ७६ ।।

नित्यपाठ - सत्पंथ साहित्य

* श्री सद्गुरु प्रति करुण प्रार्थना -

अष्टोत्तरशत तीर्थाचा महिमा। तवपादपद्मी वसतसे गरीमा ।।

द्वादश कलांचा अर्क तव शरीरा। कल्प तरुहूनी श्रेष्ठ तूं ।।६४।।

* श्री सद्गुरु प्रणाम :

सर्वश्रुति शिरोरत्नं विराजीत पदाम्बुजः।

वेदांतपद्मसूर्याय तस्मै सद्गुरुवे नमः।।६।।

अभिषेकाचे वेळी :

१) ॐ यत्पुरुषेण हविषा देवा यमज्ञतन्वत।

वसंतोअस्यासी दाज्यं दूध्मः शरध्दनिः।।

गंगा सरस्वती रेवा पयोष्णी नर्मदा जलैः।

स्नापितोऽसिमया देव तथा शांति कुरुष्व मे।।

श्री महाविष्णुप्रमुख पंचायतन देवताभ्यो नमः। स्नानियं समर्पयामि।।

देवता-इष्ट देवाचे/गुरुचे नाव घ्यावे पळीने पाणी घालावे.

२) एकत्र रुपात पंचामृत स्नान :

पयोदधि घृतं चैव मधुशर्करयायुतम्। पंचामृतेन स्वपनं क्रियतां परमेश्वर।।

गंधस्नान : (गंध+पाणी एकत्र घेऊन)

ॐ गंधद्वारां दुराधर्षां नित्यपुष्टां करिषिणीम्।

ईश्वरी सर्वभूतानां तामिहोपन्हये श्रियम्। कर्पुरैलासमायुक्तं सुगंधी द्रव्य संयुक्तम्।। गंधोदकं मया दत्तं स्नानार्थं प्रतिगृह्यताम्। श्री महाविष्णू प्रमुख पंचायतन देवताभ्यो नमः। गंधोदक स्नानं समर्पयामि। (गंधमिश्रित पाणी वाहावे) नंतर शुद्धोदकं स्नानं समर्पयामि। (शुध्द पाणी घालावे)

३) श्री गुरुमहात्म्य : संदर्भ नित्यपाठ..चरणाचे महत्त्व

ध्यानमूलं गुरोःमूर्ती, पूजामूलं गुरोःपदम् ।

मंत्रमूलं गुरोर्वाक्यं, मोक्षमूलं गुरोःकृपा ।।

४) प्रदक्षिणा व साष्टांग नमस्कार :

धन्य धन्य हि प्रदक्षिणा सद्गुरु रायाची ।

सर्वेही तीर्थे घडली आम्हां बहु पुण्यराशी ।

प्रदक्षिणा करुनी वंदितो मी सद्गुरु तव चरणा ।

देह हा तुला वाहितो, वरदहस्त शिरी ठेवा ।।

यानंतर सत्पंथात चरण तीर्थ घेण्याअगोदर म्हणावयाचा मंत्र :

मंत्र ५ : "चरणामृत पीरानो मंत्र" -

ॐ परमकृपाळू परमात्मानी कृपाथी आदरुं छु जे सदाये दयाळू छे ॐ नमो श्री सद्गुरु पात्र इंद्र इमामशाह आद्यविष्णु निरंजन निष्कलंकी नारायण तमारी आशिषे।

तमे देव निरंजन निराकार, निष्कलंकी नारायण दशमो अवतार, ईश्वर युगे युगनां ब्रह्माजी तमारा पावळना छाट थी, सप्त पाताळ एकवीस ब्रह्माडांना बंध बांध्या, ते नुर पावळे बांध्या श्री ब्रह्मा विष्णु महेश्वर कळाधरो, बेठा ते नूर छाट थी, बांध्या हरिवंशना हंसराजा परिदेना टोळ ॐ वसे स्वामिजी पाताळे देवता, जमिन, आकाश, पवन, पाणी, गुप्ती प्रगटी कुळगोत्र वंश माहे आणि वेळाअे जे कोई नुरनी आशा करे ते जीवनी आशापुरो, जळमध्ये देव निरंजननो वास छे, तमारा चरण तीर्थना प्रतापे अमने सुख शांती आपो। दया, क्षमा, शांती, अहिंसा, भक्ति, प्रिती, मुक्ती आपो।

सद्गुरु इमामशाह ॐ श्री निष्कलंकी नारायणे नमो नमः।

यानंतर चरणतीर्थामृत सर्वांनी प्राशन करावे. गुरु चरण पादुका देवघरात चिनी मातीच्या बशीत प्रतिष्ठापित कराव्यात.

सूचना : १) याप्रमाणे हा विधी (चरण पादुका पूजन विधी कृति) रोज सकाळी वा संध्याकाळी करावा.

२) रोज हा चरण पादुका पुजन विधी कृति शक्य नसेल तेंव्हा द्र गुरुवारी, गुरुपौर्णिमा या दिवशी करावा.

३) पावित्र्य पाळण्याचा प्रयत्न कसोशीने करावा.

४) इतर वेळी चरण पादुका स्थापनेनंतर हलवू नये.

ॐ श्री गुरुदेवाय नमः। ॐ श्री गुरुदेवाय नमः। ॐ श्री गुरुदेवाय नमः।

पाण्याचा वाद

श्री. श्रीराम विश्वनाथ गुजर
मु.पो.ता. नांदुरा , जि. बुलढाणा

जुन्या काळातील गोष्ट आहे. सोनबा व ग्यानबा यांची शेते जवळ जवळ होती. सोनबाच्या शेतात विहीर होती पण ग्यानबाच्या शेतात विहीर नव्हती. एकदा सोनबाच्या मुलीचे लग्न ठरले पण पैसे कमी होते म्हणून त्याने ग्यानबाला एक हजार रुपयाला विहीर विकली. ग्यानबाने एका हजार रुपये सोनबाला दिले व विहीरीचे खरेदी खत लिहून घेतले. त्यावर सोनबाने सही केली. अशा तऱ्हेने त्यांचा व्यवहारपूर्ण झाला.

एका दिवशी ग्यानबा दोर व बादली घेऊन पाणी भरण्यासाठी विहीरीवर गेला. तेव्हा सोनबा त्याला म्हणाला "मी तुला विहीर विकलेली आहे पण विहीरीतील पाणी विकलेले नाही. विहिरीवर तुझा हक्क आहे. पण पाण्यावर माझा हक्क आहे. जर तुला पाणी पाहिजे असेल तर तुला पाण्याची वेगळी किंमत द्यावी लागेल. हे सोनबाचे म्हणणे ऐकून ग्यानबाला आश्चर्य वाटले.

ग्यानबाला सोनबाचे म्हणणे पटले नाही म्हणून तो सरळ न्यायाधीशाकडे गेला. न्यायाधीशाने ग्यानबाचे म्हणणे ऐकून घेतले. न्यायाधीशाच्या लक्षात सोनबाची लबाडी आली. त्यांनी ताबडतोब सोनबाला आणण्यासाठी शिपायला पाठविले. सोनबा शिपायासोबत न्यायालयात आला. न्यायाधीशाने सोनबाला विचारले, "तू तुझी विहीर ग्यानबाला विकली हे खरे आहे काय?"

सोनबा म्हणाला, "हो साहेब"

न्यायाधीश म्हणाले, "तुला विहिरीची पूर्ण रक्कम मिळाली काय?"

सोनबा म्हणाला, "हो साहेब"

न्यायाधीश म्हणाले, "मग तुझे आता काय म्हणणे आहे? तू ग्यानबाला पाणी का भरु देत नाही?"

सोनबा म्हणाला, "महाराज, मी ग्यानबाला विहीर विकली, ही गोष्ट खरी आहे पण मी विहिरीतील पाणी त्याला विकले नाही. ग्यानबांनी मला विहिरीतील पाण्याचे पैसे द्यावे व मगच विहिरीचे पाणी काढावे."

न्यायाधीश हसून म्हणाले, "तुझे म्हणणे अगदी योग्य आहे, तू विहिरी विकून किती दिवस झाले?"

सोनबा म्हणाला, "साहेब, पंधरा दिवस झाले".

न्यायाधीश म्हणाले, "ग्यानबाने विहीर खरेदी केलेली आहे पण पाणी खरेदी केलेले नाही. त्यामुळे याला हे पाणी घेता येणार नाही. आता तू असं कर की, ही विहीर ग्यानबाच्या मालकीची असल्यामुळे तुझ्या मालकीचं पाणी तू ग्यानबाच्या विहिरीत ठेवू शकत नाही. तुझे पाणी ठेवण्यासाठी तू पंधरा दिवस ग्यानबाची विहीर वापरली. एका दिवसाचे भाडे दहा रुपये याप्रमाणे पंधरा दिवसाचे भाडे दीडशे रुपये झाले. हे दीडशे रुपये आजच्या आज ग्यानबाला दे आणि चोवीस तासाच्या आत तू तुझे पाणी विहिरीतून काढून घे. चोवीस तासानंतर तुझा विहिरीतील पाण्यावर हक्क राहणार नाही."

आपली लबाडी न्यायाधीशाच्या लक्षात आली, हे सोनबाला समजले. तो मुकाट्याने घरी गेला आणि दीडशे रुपये आणून त्याने ग्यानबाला दिले. पुढे त्याने पाण्याबद्दल कधीही तक्रार केली नाही.

प. पू. आचार्य श्री जनार्दनजी महाराज यांचे अमृततुल्य वाणीतून
दि. ७ डिसेंबर ते १३ डिसेंबर २०१० पर्यंत फैजपूर येथे झालेल्या
श्रीमद् दशावतार कथा सत्संगातील मी अनुभवलेले विचार

श्री. नरहर अवचित झांबरे (गुरुजी)
फैजपूर

दि. ७ रोजी सकाळी सतपंथ मंदीरापासून मंगलवाद्य, लेझीम, टिपरी, कलश, वैदिक धर्माच्या पताका यांचेसह पूज्यश्रींचा चांदीच्या पत्राने सजवलेला रथ अशी भव्य शोभायात्रा ग्रंथासह गावातून निघाली, यामुळे भावनात्मक व सात्विक वातावरण निर्माण झाले होते. भव्य मंडप यातील मुख्य स्टेज सुवर्णमय आकर्षक असून त्यात स्वतंत्र असे तीन सिंहासन दिसत होते. पहिल्या सिंहासनात भगवान श्री विष्णू चतुर्भज उभे, त्यांचे जवळ पांढरा शुभ्र घोडा. त्यावर पांढरी शुभ्र छत्रीसह पांढरा ध्वज. घोड्याजवळ हनुमानजी उभे हे निष्कलंकी नारायणाचे प्रतिक. दुसरे-प्रवचन व्यासगादी मध्यभागी, तिसरे सद्गुरु श्री इमामशाह महाराज आशीर्वाद देत उभे. अशा स्टेज खाली सद्गुरु श्री इमामशाह महाराज व समोर गुरुदेव श्री जगन्नाथजी महाराज यांचेसमोर अखंड दीप शेवटपर्यंत जळत राहिला. आचार्यजींनी दीप प्रज्वलन केले. नंतर श्री लक्ष्मीनारायण यांचे हस्ते गणपती, कलश पुजन झाले. नंतर 'गुरु ब्रम्हा' या श्लोकाने पाद्यपुजन, व्यासपीठ पूजन झाले. स्वागत समारंभानंतर सद्गुरु चरण पादुका, सतपंथ दिनदर्शिका, संस्कार माला भाग-२ व सीडी यांचे आचार्यजींच्या हस्ते प्रकाशन झाले. नंतर प्रवचन आरंभ - परमात्मा अनंत स्वरुप आहे त्या परम्यात्म्याला समजण्याचा व ब्रम्हानंद मिळण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. परमात्मा सत्चित आनंद स्वरूप आहे. ज्या ज्या वेळी भगवंताला गरज भासली तेव्हा भगवंत आले. गरज कां भासली ती चर्चा आपण करणार आहोत.

परमात्म्यापेक्षा संताजवळ जास्त श्रेष्ठ कला अवगत आहे. उदा. वाल्ह्याचा दुर्गूण संपवला. म्हणून संत परमहितकारी आहेत. आपल्यातील दुर्गुण काढणे हे संताचे कार्य आहे. म्हणून संत अवतरीत होतात. आणि सृष्टीच्या, धर्माच्या कार्याला हातभार लावतात. उदा. गुरु जगन्नाथजी महाराजांनी मोठे कार्य केले. संतांचे चरित्र, स्तुती गाईली जाते तेथे परमात्मा हजर असतो. संताचे सहवासात राहणे देवाला आवडते. म्हणून वैष्णव बना; तेव्हा भगवान येणार. वैष्णव ते, जे परपिडा जाणतात मनात अभिमान ठेवत नाही, त्यांची ओळख म्हणजे जो इतरांचे दु:ख जाणतो तो; तीच देवाची पूजा होय. यथाशक्ती उपयोगी बना, दु:खी माणसावर उपकार करा पण त्याचा अभिमान आणू नका. निमित्त बना. देणारा दाता रामच आहे. वेळ मिळाला तेव्हा त्याचे चिंतन करा, कोणते? "ज्याने मला या जगात पाठवले आहे, जे मिळत आहे हे त्याच्या कृपेने मिळत आहे. अशी त्याची आठवण करुन पाहा. मानव योनी ही कृपेशिवाय मिळत नाही. प्रकाशाने अंधार जातो तसा नमस्काराने दु:खरुपी अंधार जातो, कथेच्या सुरुवातीला नामस्मरण होते. नामस्मरणाने तक्रार करण्याची वेळ येत नाही. तसेच सचिंत वातावरणापासून वाचायला सोपा मार्ग नामस्मरण. जीवन जगतांना श्वास जितका महत्त्वाचा, तितकेच नामस्मरण. त्यामुळेच आपली तार परमेश्वराशी जुळते. जीवन समर्थपणे जगू शकतो. ही नामस्मरणाची

ताकद आहे. तसेच दु:ख विकत घेणे हा संतांचा स्वभाव आहे. संत शरण येणाऱ्या रोग्यालाही आशीर्वाद देतात. आपले शरीर निर्मात्याला विसरु नका. त्याने ते स्वतः बनवले आहे. ज्याने अवयव दिले त्याचे नाव घेतले पाहिजे. यासाठी सत्संग व्यवहारात आला पाहिजे. प्रत्येक कार्य जो देवासाठी करतो त्याचा संसार उत्तम होतो. सोबत नामस्मरण असले तर परमात्मा खूष होतो. आपण १रु. दिला तर तो १०लाख रुपये देतो. उदा. द्रौपदीला एका चिंधी बदल्यात भरपूर साडी पुरवली. म्हणून "पेरले ते उगवेल". १) चूक सुधारण्याची संधी म्हणजे सत्संग आहे. परमात्मा चक्रवाढ व्याजाने देतो. उदा. महाशिवरात्र-व्याधपक्षी दिसावा म्हणून पान तोडत होता. पण त्यामुळे देव प्रगट झाले. असा देव त्यांचे मर्जीने येतो. म्हणून आपण देवाची मर्जी होईल असे वागले पाहिजे. न कळत साधना घडली तरीही देव तुला विचारतो तुला काय हवे? म्हणून फक्त आपली तयारी पाहिजे. देव भेद रहित आहे. पण आपल्या दर्शन पात्रतेत काही कमी राहाते. "पात्रता म्हणजे भक्त बनणे" श्रध्देने भक्त बनले तर चैतन्य व आनंद येतो. उदा. गोपींचा विषय म्हणजे कृष्ण धर्म, भक्ती, नाम-सत्कर्म असे आपण तयार झालो तर देवाची कृपा बनते. म्हणून देवाचे पात्र बना.

परमात्मा ज्योतिस्वरुप, प्रकाश स्वरूप आहे. आपण ज्योति स्वरूप परमात्मा मानतो. आपण तेजाची मुलं आहोत. सृष्टीचे मूळ तेज आहे. ते सर्व धर्म, पंथांनी मानले म्हणून आधी सृष्टीत प्रकाश, आदिशक्ती, नारायण ब्रम्हा, विष्णू, महेश वाढत गेली. प्रकाश मूळ आहे. म्हणून भा म्हणजे तेज, रत् म्हणजे रमणारा, आपण तेजाशी रममाण झालो आहोत. गोत्री म्हणजे ऋषी. अग्नी म्हणजे देवाचे मुख. म्हणून आपण 'इदं न मम' म्हणून अग्नीचे माध्यमाने आहुती देतो. म्हणून आपण सूर्याचे पुत्र, त्याचे प्रतिक म्हणजे प्रकाश. आद्य नारायणाने ॐ मंत्र दिला. त्या नामस्मरणाचे कृपेने ब्रम्हदेवाने चार वेद (ज्ञान) केले. हे ज्ञान ब्रम्हदेवाला आद्य नारायणाच्या कृपेने झाले. म्हणजेच ज्ञानाकरता कोणाची तरी कृपा आवश्यक आहे. तेजापासून सृष्टी निर्माण झाली. परमात्मा एक स्वरुप आहे. प्रत्येक जीव परमात्मा स्वरूप आहे. परमात्मा अनेक रुपाने प्रगट झाला आहे. तो मुंगीत आहे, हत्तीत आहे "मग भेदाभेद, निंदा, मत्सर कां येतात? इतरांबद्दल वाईट विचार कां येतात? प्रत्येकामध्ये राम आहे. ज्या देवावर श्रध्दा आहे, त्याचा उपदेश जाणावा. नामस्मरण करा, राम, कृष्ण, निष्कलंकी, विठ्ठल ही सर्व साधन तेथेच नेतात. कारण परमात्मा एकच आहे. ज्या संप्रदायात आहे त्याच्या अनुयायींनी त्याची आचार संहिता मानली पाहीजे. 'दुर्योधन बनू नका, युधिष्ठिर बना!" कोणत्या संप्रदायात काय आहे ज्याचे त्याचे सद्गुरु प्रमाणे त्याला वागू द्या.

आद्यनारायणाने ब्रम्हादेवाकडून प्राणिज सृष्टी निर्माण केली. तेव्हा ब्रम्हदेवाच्या श्वासाने शंखवा नावाचा एक मानसपुत्र निर्माण झाला. जन्म:पासूनच तो आसूरी वृत्तीचा होता.

अमरीख नावाच्या राजाने आपल्या जीवाचा उद्धार व्हावा व मुक्तता व्हावी म्हणून विश्व यज्ञ आरंभला. त्यावेळी देवगण ब्रम्हा, विष्णू, महेश, ऋषी, मुनी हे हजर होते. या यज्ञाकरता शंखवालासुध्दा आमंत्रण होते. पण तो यज्ञाच्या पूर्णाहुती नंतरच्या ब्रम्हभोजनापर्यंतही तेथे आला नव्हता. मुहूर्त टळू नये म्हणून ब्रम्हाचे आज्ञेने ब्रम्हभोजन झाले. नंतर आद्यनारायण व सर्व देवांनी अमरीखाला अमरत्वाचा शुभवर देवून स्वस्थानी निघून गेले. नंतर शंखला तेथे आला. माझी वाट पाहिली नाही. माझा अपमान

केला असे म्हणून अमरीख राजास शाप दिला की, "तुझा यज्ञ करण्याचा उद्देश सफल न होता तुला १०० (शंभर) वेळेस गर्भवासाचे दुःख भोगावे लागले. हा शाप ऐकून अमरीख अति दुःखी झाला. नंतर नारायणाचे ध्यान केले. तेव्हा नारायणाने ब्रम्हदेवाला शंखवास समजवण्याचे सांगितले. त्यानुसार ब्रम्हाने शंखवास समजावले पण शंखवाने सर्व न मानता फक्त २० जन्म कमी केले. याचप्रमाणे महादेवाचे, शक्तीचे, विष्णूचे म्हणण्यानुसार प्रत्येकी २०-२० जन्म शंखवाने कमी केले. शेवटी २० जन्म बाकी राहिले. तेव्हा नारायणानेही त्यास २० जन्माची माघार घ्यायला सुचवले. व म्हटले की, "जो माझे नामस्मरण करतो त्याचे रक्षण मी करणार आहे म्हणून २० जन्म तू माझ्या भक्ताचे कमी कर. येथे भक्ताचे दुःख देवाला पाहावले नाही. येथे आचार्यजी म्हणतात "ज्यांचे पाठीशी परमात्मा उभा त्याचे काही होत नाही. त्यांचे कल्याण होते. उदा. प्रल्हाद-मीरा यांना वीष दिले पण त्यांना कोणतीही इजा पोहचली नाही. आद्य नारायणाचेही शंखवा मानत नव्हता म्हणून नारायणाने शंखवाला सांगितले की, अमरीखचे २० जन्मापैकी १० जन्म तुला घ्यावे लागतील. कारण तू माझ्या भक्ताचा अपराध नसतांना छळ केला. त्याचे फळ तुला १० जन्म भोगावे लागतील. व राहिलेले १० जन्म मी माझ्या भक्ता करता धारण करीन. तू जेव्हा जेव्हा अधर्म करशील तेव्हा तेव्हा तुझ्या कृत्याचा नाश करण्याकरता व सज्जनांचा कल्याणाकरता अवतार घेऊन तुझा संहार करीन. पुढे तोच कंस, रावण, हिरण्याक्ष, इ. बनून आला आहे. यामुळे भगवंताने १० अवतार धारण केले. म्हणून आचार्यजी येथे म्हणतात की, अमरीख बना. आद्य नारायणाने शंखवाला सांगितले की, माझ्या अंशाने विष्णू अवतार धारण करुन तुझा संहार करीन. सृष्टी चक्र सुरळीत चालण्याकरता भगवंताला १० अवतार घ्यावे लागले. सृष्टीत ज्ञान पसरावे म्हणून नारायणाने ब्रम्हदेवाला मोठी शक्ती देवून चार वेद केले. पण त्यानंतर ब्रम्हदेवाला त्या ज्ञानाचा गर्व झाला की, सृष्टी मी निर्माण केली तेव्हा ब्रम्हदेवाचा हा अहंकार काढून टाकण्याकरता नारायणाने शंखवासुराला सांगितले की तू ब्रम्हदेवाच्या चारही वेदांचे अपहरण कर. (चोरुन ने.) त्यानुसार शंखवाने चारही वेद चोरून नेले येथे आचार्यजी म्हणतात, "मी पणाला ठाव देवू नका. मी माझें माझे करणारा शेवटी बरोबर काय नेतो? ज्ञान मिळाले तर अहंकारी व्हायला नको. ज्ञानी व्यक्तीला प्रत्येक जीव ज्ञानी दिसतो. पण स्वतःला ज्ञानी व दुसऱ्याला अज्ञानी म्हणतो तो अजून अज्ञानी समजावा. परमात्मा ज्ञान स्वरुप आहे. नंतर ब्रम्हदेव नारायणाकडे गेले व म्हणाले तुमच्या कृपेने जे ज्ञान होते ते गेले म्हणून मला माझे वेद परत द्या. त्यानंतर नारायणाचे आज्ञेनुसार विष्णू शंखवाकडे निघतात. तेव्हा शंखवा हा पृथ्वीवर होता. त्याला पृथ्वीने लपायला जागा दिली. कारण पृथ्वीला शंखवामुळे देव भेटतील असे वाटले. भगवान विष्णू पृथ्वीजवळ आलेच. पृथ्वीने स्वागत करुन भगवंतास येण्याचे कारण विचारले. भगवान सर्व सांगतात तेव्हा पृथ्वी भगवंताला या वेळी वर मागते की, माझी इच्छा तुमच्या बरोबर लग्न करावयाची आहे. तेव्हा विष्णू भगवंताने पृथ्वीला वचन दिले की, पुढे मी जेव्हा कल्की भगवान बनून येईल तेव्हा तुझे वचन पूर्ण करीन. पण आता तू मला मदत कर. तेव्हा पृथ्वी शंखवाला शोधायला जाते. तोच शंखवा तेथून पळतो मागे भगवान पळतात. येथे आचार्यजी म्हणतात की, "जो जीवात्मा आसक्तीत फसला त्याला दुःखात भान नसते. उदा. सीतामाता, परमात्मा शंखवामागे पळत असतांना शंखवा विजल पाताळात गेला. देवाचा.

पाठलाग सुरुच होता. "अधर्माचा नाश करण्यासाठी भगवान कितीही मेहनत करुन त्याचा नाश करतात. पुढे शंखवा शंखोदर बेटात शंख होऊन चारही वेदांसह बसला म्हणून भगवंतानेही "मस्याचे रुप" धारण करुन शंखवाजवळ पोहोचले. वेद मागितिले, ते न दिल्याने शेवटी भगवंताने तेथेच शंखवा सुराचा अंत केला. म्हणून हा १ला मस्यावतार विष्णू भगवंताचा झाला व असूराचा नाश केला. येथे आयार्चजी म्हणतात १) "जो शास्त्राच्या विरोधात जीवन जगतो तो असूर! पण शास्त्रानुसार जो जीवन जगतो तो सुर. २) भगवंताने पाण्यात शंखवाला शोधून मारले. म्हणून पाणी पोहणाराला बुडवते. पण प्रेताला तरंगत ठेवते. हा पाण्याचा स्वभाव आहे. देवही असाच आहे. कारण की, पोहणारा आसक्तीत असतो. त्याला मी पणाचा अभिमान असतो. म्हणून त्याला मारतो, पण प्रेत हे पाण्याला समर्पित असते म्हणून ते तरते. म्हणून समर्पित व्हा. तरुन जाल. अहंकार केला तर डुबाल. २) त्या शंखवाला वेदांचा स्पर्श झाला होता म्हणून शंख पवित्र आहे. म्हणून शंख देवाच्या स्नानाला वापरला जातो. ४) शंखासुराचा आपणही नाश करु या. शबरीची श्रध्दा होती म्हणून तिने १५ वर्षे रामाची वाट पाहिली. पण रामाबद्दल थोडीही शंका मनात आणली नाही. म्हणून राम आले. म्हणून शंका मुक्त व्हायचे शबरीकडून शिका. शंका मुक्त होऊन नमस्कार करा. जे आधी देवाने दिले आहे त्याबद्दल आभार मानावे. पण आपण उलट मागणीच करतो. देव न मागता भरभरुन देतो. उदा. प्रल्हाद, द्रौपदी. म्हणून देवा तू मला खूप दिले आहे. म्हणून मी तुझे आभार मानतो हे रोज म्हणा.

एकादशी व्रत (रुख्मांगद राजा)

रुख्मांगद नावाचा राजा व्रतनिष्ठ व धर्मज्ञ होता. त्याच्या बगीच्यातील फूल इंद्राचे दूत चोरुन नेतांना त्यांचे विमान पकडले. नंतर ते विमान चालू होत नव्हते. एकादशीचे पुण्य देणाऱ्याकडून ते विमान उडू शकणार होते. तेव्हा राजाने एकादशीला उपवास घडलेल्या स्त्रीला आणले. तीने विमानाला हात लावताच विमान उडून गेले. एकादशी ही भगवंताच्या श्वासापासून उत्पन्न झाली आहे. हे व्रत जो करिल त्याला वैकुंठ लोक मिळेल. **व्रताची रित** – दशमाला एकभूक्त व एकादशीचे दिवशी पूर्ण उपवास व द्वादशीला सकाळी पारणे. एकादशीचे व्रताचे माहात्म्य कळल्यामुळे राजाने राज्यात सर्वांनी हे व्रत करावे असा नियमच केला. त्यामुळे सर्व लोक एकादशी व्रत करीत. ज्याचा मृत्यू झाला तो वैकुंठात जात होता. त्यामुळे यमाकडे कोणी जाईना. हे देवांनी पाहिल्यावर त्यांना राजाबद्दल मत्सर वाटू लागला. व राजाचे हे व्रत भंग करावे म्हणून इंद्राने अतिसुंदर अविवाहित अशी मोहीनी राजाकडे पाठविली. तिला पाहून राजा मोहित होऊन विकारवश होतो व तिच्या म्हणण्याप्रमाणे वागेन असे त्या मोहिनीला वचन देऊन तिच्याशी लग्न करतो. तिचे सोबत असतांना एकादशी व्रताची जाणीव त्या दिवशी झाल्याने राजा एकादशी दिवशी भोगविलास करण्यास तयार नसल्याने मोहिनी म्हणते तुम्ही मला भाष्यदान (वचन) दिले आहे. म्हणून व्रत आज सोडा. राजा एकादशीचे व्रत सोडायला तयार नसल्याने ती राजाला त्यांचा एकुलता एक मुलगा धर्मांगद त्याचे शीर दे, नाहीतर एकादशीचे व्रताचा त्याग कर अशी अट घालते. त्यामुळे राजा संकटात पडला. हे धर्मांगाद मुलाला कळले तो बापास म्हणाला "माझे शीर मी मोहीनीला देण्यास तयार आहे. पण तुम्ही व्रत सोडू नका".

मुलाचे हे बोल ऐकून राजा म्हणतो, मुलाचा वध केला तर ते अनिष्ठ आहे. व्रत सोडले तर नरकात जावे लागेल. शेवट राजा मुलाचे शीर कापण्यास सज्ज असतांनाच भगवान विष्णू शंख चक्र गदाधारी अशा

ॐ नमो निष्कलंकी नारायण जनार्दनाय। भस्मायुधाय विद्महे। दिव्यनेत्राय धीमहि। तन्नोज्वहर: प्रचोदयात्।। ॐ शांति: शांति: शांति:

रुपात आले व त्यांनी राजाचे हात धरले या प्रकारामुळे नगरीतील सर्वांना भगवंताचे दर्शन झाले. लगेच वैकुंठातून विमाने आली व सर्वांना विमानात बसवून भगवंताने वैकुंठात नेले. मात्र खाली एकटी मोहिनी राहिली. नंतर तिला नरकवास मिळाला. कारण तिने पतिद्रोह करुन व्रतभंग करित होती म्हणून नरकवास गेली नंतर ती विष्णूकडे जाते. विष्णू तिला रुख्मांगद राजाकडे पाठवतात. ती राजाजवळ येते. तेव्हा रूख्मांगदने एकादशीचे पुण्य देवून मोहीनीची नरकातून सोडवणूक केली असे एकादशी व्रताचे माहात्म्य आहे. यावेळी आचार्यजी सांगतात-

१) आपण साधनेपासून दूर गेल्यामुळे विकार वाढतात. २) कसे जगायचे हे नक्की झाले पाहिजे. ३) राजा श्रीमंत असून तो किती वेळ परत्म्यामाला देतो. देवाला विसरत नाही. तो खरा श्रीमंत आहे. ज्याचे जवळ अभिमान नाही तो श्रीमंत. तसेच देवाला नमस्कार करुन देवाचा होऊन जगतो तो श्रीमंत. ४) धर्मांगद हा मुलगा तरुण होता. पण तो कर्तव्याला जागला. हे आज प्रत्येकाने ओळखले पाहिजे. ५) आपत्काळीही धर्माचे पालन सोडू नका. धर्म भ्रष्ट होऊ नका राजाचे मुलावर प्रेम असून त्याचे बलीदान द्यायला तयार हे खऱ्या अर्थाने व्रत आहे. ६) तळमळ असली तर परमात्मा तुमचा आहे.

दुसरा कुर्मावतार (कुर्म अवतार)

शंखवाचा वध केल्यामुळे मधु व कैटभ व प्रबळ दैत्य देवांना त्रास देत. एकदा दुर्वास ऋषी ब्रम्हलोकात आल्यावर रस्त्याने इंद्र भेटले तेव्हा दुर्वासांनी गळ्यातील फुलमाळा काढून ती इंद्राच्या अंगावर सन्मार्थ टाकली. पण उन्मत्तपणे इंद्राने तिचा स्वीकार न करता हत्तीच्या पायाने ती माळा चिरडून टाकली. तेव्हा दुर्वासांना हा अपमान वाटला व ते क्रोधिष्ठ झाले व त्यांनी शाप दिला. त्या शापामुळे इंद्र व तिन्ही लोक निस्तेज झाले. यज्ञ कर्म नष्ट झाले. येथे आचार्यजीं म्हणतात ''जेव्हां सज्जनांचे तेज जाते तेव्हा दुर्जनांचा प्रभाव वाढतो. येथे हा संताच्या अपमानाचा परिणाम आहे. नंतर सर्व देव ब्रम्हदेवाकडे गेले. मनोभावे स्तुती केली. तेव्हा भगवंताने सांगितले की दैत्यांशी सख्य करा. नंतर समुद्र मंथन करा. त्यातून तुम्हाला अमृत मिळेल. मी मदत करीत असे भगवंताने सांगितल्यानंतर समुद्र मंथनाची तयारी झाली. त्यात मंदार पर्वत रवी म्हणून व वासुकीनागाचा दोर म्हणून उपयोग करुन मंथन सुरु झाले. पण तळाशी काही आधार नसल्याने पर्वत पाण्यात बुडू लागला. त्यावेळी भगवंताने अद्भुत असे कुर्मरुप धारण केले व पाण्यात बुडत असलेल्या पर्वताला आपल्या पाठीचा आधार दिला. व आपल्या पृष्ठ भागावर मेरु पर्वतास सावरून धरले. मंथनातून प्रथम हलहल वीष निघाले. तेव्हा सर्व देव शिवाला शरण गेले तेव्हा शिवाने ते विष प्राशन केले. नंतर कामधेनू निघाली ती वसिष्ठाला दिली. नंतर उच्चैश्व घोडा निघाला तो सूर्याला दिला. नंतर पांढरा ऐरावत, पारिजात, अप्सरा इंद्राला दिला. नंतर कौस्तुभ शंख हे विष्णूर्नी घेतले. नंतर लक्ष्मी निघाली ती मला मिळावी म्हणून सर्व देव असूर उत्सुक झाले पण लक्ष्मीने भगवंताचे गळ्यात माळ घातली. नंतर अमृत कलश निघाला. तेव्हा देव व दैत्य वेगवेगळ्या रांगेत बसवून मोहीनीने देवांना युक्तीने अमृत दिले. तेव्हा सर्व देवांना तेज आले. दानव पराभूत झाले. धर्माचा जय जयकार व्हावा म्हणून देवाने हा कासवाचा अवतार प्रगट केला.

(क्रमशः)

लोक जागृतीचे प्रवर्तक संत तुकाराम

श्री. भरतबुवा रामदासी
बीड

समाज जीवनातील अज्ञान अंधःकार दूर व्हावा आणि मानवी मनाची सर्वांगिण उन्नती व्हावी, यासाठी या देशात संत अवतीर्ण झाले. महाराष्ट्राच्या संत मालिकेत संत तुकाराम महाराजांच स्थान अनन्य साधारण आहे. तसं बघितलं तर सारेच संत एकाच दर्जाचे असतात. आपल्या अलौकिक कार्य कर्तुत्वामुे ते अजरामर ठरतात. सत्पुरुषांचय चरित्रांतून या देशाचा इतिहास घडत असतो. संत तुकाराम महाराजांचे जीवन चरित्र देखील महाराष्ट्राच्या इतिहासाला यशोमंदिरावर नेणारे मंगल चरित्र ठरले. तुकाराम महाराजांच्या काळात देखील भक्ती क्षेत्रात ढोंग, बुवाबाजी, अंधश्रद्धा, अनाचार इ. अनैतिक मूल्ये बळावली होती. खरी भगवद्भक्ती लोप पावली होती, अशी परिस्थितीत **बुडते हे जन न देखवे डोळा । येतो कळवळा म्हणूनिया ।।** या अखंड तळमळीने तुकाराम महाराजांनी आपले लक्ष्य समाजाच्या उद्धाराकडे वळविले. समाज मनाच्या आत्मिक उन्नतीसाठी त्यांनी आपला देह चंदनासारखा झिजविला. या देशात समात, एकता, सहिष्णूता मानवता या मानवी मुल्यांचे जतन होण्याकरता सर्व सामान्याला पटेल आणि पचेल अशी अभंग रचना केली. कीर्तन भक्तीच्या व्यासपीठावरून मानवी अंतरंगात सदाचाराचे बीजारोपण केले. तत्कालीन समाज विघातक कृत्यावर कडाडून प्रहार केला. भागवत धर्माचा पाया संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी रचिला असला तरी –

ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस ।

या उक्तिनुसार तुकाराम महाराज भागवत धर्माचे कळस ठरले.

इंद्रायणी तिरावर असणाऱ्या देहू गावातील बोल्होबा आणि कनकाई या शुचिष्मंत विठ्ठल भक्तींच्या उदरी तुकोबांचा जन्म झाला. अनेक पिढ्यांपासून चालत आलेला विठ्ठल भक्तीचा वसा वारसा त्यांनी निष्ठापूर्वक जतन केला. माझ्या वडिलांची **मिरासी गा देवा । तुझी चरण सेवा पांडुरंगा ।।**

अशी घराण्याची वतनदारी सांगताना त्यांना स्वाभिमानाची वाटला. परंपरागत चालत आलेला चरितार्थांचा व्यवसाय सांभाळून, हरिनाम कीर्तनाची वीणा वाजवीत तुकोबा तासनतास रंगून जात. **दिनरजनी हाचि धंदा। गोविंदाचे पोवाडे।** श्रीरंगाच्या रंगात रंगलेल्या त्यांच्या जीवनात भावभक्तीने तरंग साकार होत होते. **आवडे हे रूप गोजिरे सगुण। पाहता लोचन सुखावले।।** अशा भक्तिसुखात रमलेल्या जीवाला संसारातील ऐहिक सुख मात्र नियतीने फार काळ लाभू दिले नाही. पहिली पत्नी व्याधिग्रस्त असल्याने, वाल्होबांनी त्यांचा दुसरा विवाह केला. आता कुठे संसार सुखाची वाटचाल करणार, एवढ्यात रोगाच्या साथीने त्यांची आई-वडिल व भावजय काळाने हिरावून नेली. भयानक दुष्काळाचे थैमान देहू गावात तांडव नृत्य करु लागले. याच दुष्काळात घरादाराची वाताहत झाली. धंदा बुडाला... या घटनेचा त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला तथापि **ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असु द्यावे समाधान।।** या समाधानी वृत्तीने काही काळ संसार केला, पण आता त्यांची अवस्था जीवनावेगळी मासोळी....! अशी झाली. त्यांना पंढरीच्या सावळ्या सुंदर नयन मनोहर रुपाचा वेध लागला. जागृति स्वप्न सुषुप्ती नाठवे, अशा स्थितीत त्या अगणित लावण्याचा सगुण साक्षात्कारासाठी त्यांनी एकांतवास पत्करला.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षी ही सुस्वरं आळविती ।।
येणे सुखे रुचे एकांताचा वास। नासही गुण दोष अंगा येता।।

लोकांतात कधी एकांत होत नाही. एकांत केल्याशिवाय मन शांत होत नाही व मन शांत झाल्याशिवाय श्रीकांत दिसत नाही. म्हणून देह गावाहून सुदूर असणाऱ्या भंडाऱ्या डोंगरावर ते नामसाधना करु लागले. याच तपाचरणाच्या काळात शके १५४१ गुरुवार माघ शु. १० या दिवशी चैतन्य संप्रदायातील बाबाजी सद्गुरुंचा त्यांना अनुग्रह झाला. रामकृष्ण हरि या गुरुमंत्राची दीक्षा घेऊन व पांडुरंगाची कृपा संपादन करून लोकाद्धारार्थ ते भागवत धर्माचा प्रचार करु लागले. कीर्तनाच्या व्यासपीठावरून समाज विघातक कृत्यावर प्रहार करु लागले.

संत तुकाराम महाराजांच्या काळात शुद्ध भक्तीचा लोक होऊ अंधश्रद्धा बळावली होती. कर्मकांडाच्या बेडीत समाज जीवन जखडून गेले होते. रुढील दैववाद, देव देवतांच्या भ्रामक कल्पना यांना उत आला होता. समाजाची ही सांस्कृतिक अधोगती पाहून या दृष्ट्या महापुरुषाला विलक्षण चीड आली आणि देव धर्माच्या नावाखाली सर्वसामान्यांची फसवणूक करणाऱ्या देवऋषीचा त्यांनी कडक शब्दात निषेध केला.

डोई वाढवोनि केस । भुते आणिती अंगात।।
मेळवूनि नरनारी । शकून सांगती नानापरी।।

अशा भूत भविष्य वर्तमान सांगणाऱ्या व अंगात देव संचारणाऱ्या या देवऋषींना त्यांनी खडसावून विचारले -

देव्हारी बैसोनि हालविली सुपे। ऐसी पापी पापे लिंपताती।
तयाचे स्वाधीन दैवते असती। तरी का मरती त्यांची पोरे।।

यावरून त्यांचा बुवाबाजीवर कटाक्ष होता. कोणतीही गोष्ट आंधळेपणाने करू नये अशा प्रखर बुद्धिवादी विचाराचे ते होते. पारलौकिक कल्याणासाठी व आत्मशांती लाभण्याठी ईश्वराची भक्ति करावयाची ऐहिक सुखोपभोगासाठी देवाला नवस करणे वेडेपणाचे लक्षण आहे.

नवस कन्या पुत्र होती। तरीका करणे लागे पती।
शेंदराचे दैवत केले। बोले तया नवस।।

अशा अंभगातून देवाला ऐहिक साकडे घालणाऱ्या त्यांनी खरपूस समाचार घेतला. तुकाराम महाराजांच्या काळात अनैतिक कृत्यें बळावली होती. सुखी संसारातल्या स्व स्त्रीचा संग सोडून परस्त्रीच्या नादी लागणारा कामांध माणूस त्यांनी पाहिला.

साधूच्या दर्शना लाजशी गव्हारा।
वेश्येचिया घरा पुर्ष्ये नेसी।।
वेश्यादासी मुरळी जगाची ओवळी।
ते तुज सोवळी वाटे कैसी।।

असा प्रश्न विचारून त्या कामांधास सुंदर उपदेश करताना ते म्हणतात

पराविया नारी माऊली समान। मानलिया धनकाय वेचे।।

व्यसनाधिन माणसाबद्दल त्यांना विलक्षण चीड होती. अशा माणसाला पैजारानेच मारावे असे ते म्हणत.

गंथ जगाळीता कष्टी आवडीने भागं घोटी।।
देव पूजेचा कंटाळा।। हाती सोंगट्यांचा चाळ।।
तुका म्हणे ऐशा नरा। मोजूनी माराव्या पैजारा।।

दंतकथा, चमत्कार अशा भाकड कथावर महाराजांचा मुळीच विश्वास नव्हता. अनुभवजन्य ज्ञानालाच ते किंमत देत होते.

नका दंत कथा सांगू कोणी। कोरडे ते मानी बोल कोण।।
अनुभव येथे पाहिजे साचारा। न चालती चार आम्हा पुढे।।

या र्स संत वचनावरून महाराज, बुद्धिनिष्ठ पुरोगामी विचारांचे संत होते हे स्पष्ट होत. तत्कालिन समाज जीवनातील अनैतिक कृत्यांवर प्रहार करुन लोकोद्वाराचे व समाज प्रबोधनाचे महान कार्य त्यांनी केले. समाज दुराचारापासून परावृत्त व्हावा व सदाचाराकडे प्रवृत्त व्हावा हा विचार आचार सिद्ध व्हावा म्हणून त्यांनी शुद्ध भक्तिमार्गाचा उपदेश केला. समाज जीवनाची विस्कटलेली घडी बसविण्यासाठी हरिभक्ताचे जनजागरण केले.

परमात्मा सर्वांभूती आहे. कोणत्याही प्राणी मात्राचा द्वेष, तिरस्कार करु नका, अशी मानवतावादी शिकवण त्यांनी आपल्या भागवत धर्म प्रचारांतून दिली.

कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।

उच्च नीच असा भेदभाव परमेश्वरांस आवडत नाही. तो भक्तिभावाचा भुकेला आहे.

सकळासी येथे आहे अधिकार। कलीयुगी उद्धार हरिनामे
उच्चनीच काही नेणे भगवंत। तिष्ठे भाव भक्त देखुनिया।।

जनता हाच जनार्दन व जनसेवा हिच ईश्वरभक्ती अशी संताची धारणा होती.

जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।।
तोचि साधु ओळखावा। देव तेथेची जाणावा।।

व्याख्या केली. तुकाराम महाराजांच्या वाङ:यात धर्म व भक्ती आहे पण ही भक्ती सर्वसमावेशक आहे. भक्तीशास्त्रात कर्मकांडाचा अवडंबर त्यांनी कधीच माजविला नाही. आपले स्वाभाविक कर्म अनासक्तीने अहंकार रहित करणे, आपल्या उपास्य देवतेवर अव्याभिचारी निष्ठा ठेवणे यासच खरी भक्ती म्हणतात. भगवद् दर्शनाची अंतरंगात आर्तऽऽऽ तळमळ निर्माण झाली पाहिजे. भक्तांची अवस्था ही

कन्या सासुराशी जाये। मागे परतूनी पोहे।।
तैसे झाले माझ्या जीवा। केव्हा भेटेशी केशबा।।

परमेश्वराची भक्ती ही उत्कट प्रेमाने ओथंबलेली असावी. तिच्यापुढे बाकी सर्व सुखें तुच्छ वाटली पाहिजेत.

संसारावरील प्रेम भगवंताला अर्पण करता आले पाहिजे. **हेचि थोर आवडते देवा। संकल्पावी माया संसाराची।।** हेच शुद्ध भक्तीचे रहस्य होय. वारकरी पंथाच्या उदारमतवादी व सर्वसमावेशक तत्वज्ञानातून तुकाराम महाराजांनी अहिंसा, भूदया, परोपकार, दया, दाक्षिण्यं, समता, बंधुता इ. नैतिक मूल्यांचे पाठ महाराष्ट्रीय जनतेस दिले. भागवत धर्माचीर विजय पताका कर्मठतेच्या काळात फडकावित ठेवली म्हणूनच ते लोक जागृतीचे प्रवर्तक ठरले. आज एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या भौतिक युगात नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. माणूस मानवतेला पारखा होत आहे. विकार विवशतेचे ग्रहण लागलेल्या आयुष्यात प्रकृतीतच विकृती निर्माण होत आहे. अशा वेळी संत वाङ:मय लोकशिक्षणाचे व संस्कृती संवर्धनाचे कार्य समर्थपणे करू शकेल. विज्ञान युगात निर्माण झालेल्या सामाजिक समस्यांच्या निराकरणाचा चिरस्थाई विचार संत वाङ:मयात आहे.

प.पू.ब्र. आचार्य जगन्नाथ महाराज यांची नवम पुण्यतिथी महोत्सव २०१० वृत्तांत

श्री. शैलेंद्र महाजन (सर)

सत्पंथाला समाजोन्मुख बनवणारे आणि खान्देशात व मध्यप्रदेशात सत्पंथाला मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी अथक प्रयत्न करणारे प.पू.ब्र. आचार्य जगन्नाथजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन दरवर्षीप्रमाणे १३ व १४ डिसेंबर २०१० रोजी सत्पंथ संस्थान मंदीर फैजपूर यांचेकडून करण्यात आले.

यावर्षी या महोत्सवानिमित्त ७ ते १३ डिसेंबर या काळात श्रीमद् दशावतार कथेचे आयोजन मिरची ग्राऊंडवर करण्यात आले. या कथा आयोजनात शिवाजीनगर मित्र मंडळाचे अनमोल सहकार्य लाभले. त्यानंतर १३ डिसेंबर १० रोजी संध्याकाळी सत्पंथ मंदीरामध्ये पुण्यतिथी निमित्त महापूजेचे आयोजन करण्यात आले. पूजाप्रसंगी प.पू. आचार्य जनार्दन महाराजांनी उपस्थित भक्तांना उद्बोधित करतांना भक्तीभाव, गुरुमहिमा यां विषयांच्या विवेचनाबरोबरच जगन्नाथजी महाराजांच्या सत्पंथासाठीच्या कार्याचे श्रेष्ठत्व व्यक्त करुन श्रध्दांजली अर्पण केली.

१४ डिसेंबर रोजी सकाळी सत्पंथ मंदीरापासून शोभायात्रा सुरु झाली. रजतपत्राने सजवलेल्या अश्वरथावर पूज्य आचार्य जनार्दन महाराज, त्यांच्यापुढे पंचक्रोशीतील भजनी मंडळ, दांडिया मंडळ (पाल), झांज पथक (वाघोदा) व कलश धारण केलेल्या महिला होत्या.

निष्कलंकी नारायणाच्या नामघोषात भाविक व संतगण समाधी स्थळापर्यंत पोहचले. समाधीस्थळी ब्र. जगन्नाथ महाराजांच्या समाधीचे पुजन वैदिक पद्धतीने संतांच्या उपस्थितीत करण्यात आले. गुरुंची आरती करण्यात आली. यानंतर सर्व संताचे व्यासपीठावर आगमन झाले. व्यासपीठावर उपस्थित संत प.पू. महामंडलेश्वर देवेंद्रानंदगिरीजी महाराज, राष्ट्रीय कीर्तनकार प.पू.श्री योगेश्वर उपासनी महाराज, प.पू. संतोषानंदजी महाराज, प.पू.श्री जयरामदासजी महाराज, प.पू.श्री गंगेश्वरदासजी महाराज, प.पू.श्री सोमदासजी महाराज, प.पू.श्री शिवरामदासजी महाराज, प.पू.श्री सोमदासजी महाराज, प.पू.श्री शामळदासजी महाराज, प.पू.श्री पुरुषोत्तमदासजी महाराज, प.पू.संतश्री तुलशी बापा, प.पू.संतश्री शामजी दादा, प.पू.संतश्री नारायण बापा, प.पू.संतश्री शांतीदास भगत, ब्रम्हाकुमारी शकुंतला दीदी यांनी उपस्थित भाविकांना आशीर्वचन दिले.

प.पू. आचार्य जनार्दन महाराज म्हणजे सत्पंथाला मिळालेला कोहिनूर हिरा असल्याचे मत पूज्य उपासनी महाराजांनी व्यक्त केले. तर महाराजांच्या प्रभावी व्यक्तिमत्वामुळे येथे संताची मांदियाळी गोळा होते असे पू. महामंडलेश्वरांनी प्रतिपादन केले.

दरवर्षीप्रमाणे विशेष सत्काराचे आयोजन केले गेले. धुळे येथील सत्पंथ अनुयायी श्री. नवलसिंग सिसोदिया यांनी पदयात्रेद्वारे नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्यामुळे ते यावर्षीचे विशेष सत्काराचे मानकरी ठरले. तसेच प्रा. उल्हास बोरोले (माजी प्राचार्य) यांना सत्पंथातील मुखी म्हणून वैदिक मंत्रोपच्चाराने दीक्षा देण्यात आली.

अत्यंत भावपूर्ण वातावरणात नवम पुण्यतिथी महोत्सव पार पडला.

कर्मयोग व्याख्या आणि प्रयोजन

श्री. एकनाथ शंकर जाधव
मु.पो. पहूर, ता. जामनेर

सामान्यपणे लोकांमध्ये कर्मयोगाबाबत निश्चित असा अर्थ नसतो. त्याच्याबाबत विविध कल्पना अनेकजण करतात. काहीजण बायकामुलांचा संसारच कर्मयोगाचे आचरण समजतात. देवानेच आमच्या पाठीशी प्रपंच लावला आहे. तो निटपणे करणे हेच कर्तव्य समजतात. व समर्थ रामदासांनी "आधी प्रपंच करावा नेटका" असा उपदेश केल्याचे सांगतात व हाच कर्मयोग समजतात. त्यातील काही लोक अन्याय व परपीडा वर्ज्य करुन सुखाने संसार करण्याला कर्मयोग समजतात. काहीजंण गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी साह्य करणे व सार्वजनिक संस्थांना दान दिल्याने कर्तव्य संपले असे समजून तोच कर्मयोग समजतात तर काहीजण प्रपंचात ग्रहून स्नानसंध्या, देवपुजा नियमीत करणे. हेच कर्तव्य समजून त्याला एखादे पुरक सत्कर्म करणे हाच कर्मयोग समजतात. उच्च शिक्षणाने देश परदेशात ज्ञान मिळविलेल्या लोकांच्या मते जो साहसी मनुष्य आपला लहान धंदा वाढवून त्याचा मोठा उद्योग बनवितो अथवा आपल्या प्रयत्नाने सर्वत्र शाळा, महाविद्यालये स्थापन करणाऱ्याला अथवा महत प्रयासाने शास्त्रादी शोध लावणारा, सतत प्रयत्न करुन एखादे समाज सुधारणेचे कार्य-करणाऱ्याला किंवा स्वार्थत्यागाने समाज सुधारणेचे कार्य करणाऱ्याला, देशसेवा करणाऱ्याला ते कर्मयोगी समजतात.

कर्मयोग या समासातील कर्म या शब्दाचा अर्थ मनुष्य करीत असलेले कोणतेही काम असा असला तरी कालखंडानुसार त्या त्या कालखंडात सर्वमान्य अशा प्रमुख कार्याला कर्म ही संज्ञा प्राप्त होते. उदा. वेदकाळात यज्ञयाग, अग्नी होत्रादी कर्मे हिच श्रेष्ठ कर्मे समजली ज्रत. कालांतराने मनुस्मृती यज्ञवक्ल स्मृती इं. ग्रंथ उत्पन्न झाले श्रोतककर्माबरोबर धर्मानुचारी स्मार्त कर्मे ही कर्म ह्या शब्दाच्या व्याखेत गोवली गेली.

मनुष्याची चांगली वाईट कामे पाहून स्मृतींनी त्याची ४ प्रकारे विभागणी केली. नित्य, नैमित्तीक, काम्य व निषीध्द अशी होत. त्यात निषीध्द कर्म म्हणजे चोरी, हिंसा, व्यभिचार व मद्यपान आणि ही निंद्य कृत्ये करणाऱ्या लोकांचा सहवास ही होत. धर्मने ह्या पाच त्याज्य कर्मांना पंचमहापातके असे नाव दिले व ही कर्मे पूर्ण वर्ज्य करण्यास सांगितले.

इहलोक व परलोकातील फलांच्या अपेक्षेने केलेली यज्ञव्रतादी कर्मे ही काम्य कर्मे होत. कालांतराने वैदीक धर्माची वाढ झाल्यानंतर काम्यकर्मे ही त्याज्य ठरवून मुमुक्षूने नित्य नैमित्तीक कामे मात्र केल्याने चित्तशुध्दीद्वारा मोक्ष प्राप्ती होते असे सांगितले गेले.

आता धर्मशास्त्राने दैनंदिन कर्माबरोबर इह-पर कल्याणासाठी पाच धर्म कार्ये नित्य करावी असे सांगितले ती अशी १) देवयज्ञ (देवांची पुजा) २) ऋषीतुल्य : (श्रृतीशास्त्रांचा अभ्यास) ३) पितृयज्ञ : (पितरांना अन्नाची आहुती) ४) भुतयज्ञ : (अतिर्थींना आसन, भोजन इ.) ५) भुतदया : (गाई, कावळे, मुंग्या इ. जिवजंतुना खाद्य देणे) यांनाच पंचमहायज्ञ असे संबोधतात.

पर्वकाळ, उत्सव, तिर्थयात्रा इ. निमित्ताने करावयाच्या कार्यांना नैमित्तीक कर्मे असे संबोधून ती अवश्य करावी असे सांगितले. तात्पर्य श्रेयाची इच्छा बाळगळाल्याने काम्य व निषीध्द कर्मे सोडावीत व नित्य नैमीत्तीक कामे करावी अशी

धर्माने आज्ञा केली.

समाजातील वर्णव्यवस्थेनुसार मनुष्याची कर्तव्ये धर्मग्रंथांनी निश्चित केली. ब्राम्हणांनी वेदोक्त, शास्त्रोक्त, कर्मे करावी, क्षत्रीयांनी न्यायाची बाजू घेणे. धैर्य, शौर्य वगैरे सद्गुण ठेवणे, वैश्यांची कर्तव्ये - व्यापार, उद्योग, शेती, पशुपालन इ.

क्षुद्रांची कर्तव्य - शारीरिक श्रमाची कामे करणे

यांप्रमाणे कर्मयोग या समासातील कर्म हा शब्द श्रोत, स्मार्त, वर्णाश्रम, नित्य, नैमीत्तीक, याप्रमाणे वर्णीलेले आपले योग्य उपजीवीकेचे साधन, धार्मिक कार्य, परोपकार इ. सत्कर्मे सुचीत करतो आणि दुसरा योग हा शब्द ती सत्कर्मे कोणत्या युक्तीने करावी हे दाखवितो.

याप्रमाणे कर्मयोग हा कर्मबंधाचा परीहार करणारा उपाय आहे. (पुर्वार्ध)

संगीतमय श्रीमद् दशावतार कथा सप्ताह धानोरा

दि. १२ जानेवारी ते १९ जानेवारी २०११ पर्यंत

- मुखीश्री विजय महाराज

धानोरा

प.पू. जगद्गुरु करसनदासजी महाराज, प.पू. आचार्य जगन्नाथ महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व प.पू. आचार्य श्री जनार्दनजी महाराज यांचे अमृतवाणीतून संगीतमय श्रीमद् दशावतार कथेचे आयोजन सत्पंथी अनुयायी मंडळ व सर्व ग्रामस्थ बांधव यांनी केले. श्रीमद् दशावतार कथा धानोरा येथे आठ झाले. त्यापैकी हा नववा कार्यक्रम आगळा-वेगळा पद्धतीने झाला. कार्यक्रमाची सुरुवात दि. १२ जानेवारी रोजी सकाळी १० ते २ वा. ग्रंथ दिंडी मिरवणुकीने सत्पंथ ज्योत मंदीर ते ज्ञानमंडपापर्यंत झाली. कथेचे वाचन दररोज दुपारी २ ते ५ व रात्री ८ ते १० अशी होती. परंतु कार्यक्रमाचे स्वरुप बघून गावातील व बाहेरगावातील भक्तांच्या उपस्थितीमुळे १ तास वेळेपेक्षा जास्त घेतले जात होते. कार्यक्रमातील सजीव देखावा, संगीताची भर, मंडपाची शोभा व मंडपातील रात्रीचे रोषणाई यामुळे तसेच महाराजांच्या मुखातून अध्यात्म तत्त्वज्ञान व प्रसंगानुसार हरीश्चंद्र भक्त प्रल्हाद यांच्या प्रसंगी भक्तांच्या डोळ्यातून पाणी तरारत होते. दि. १४/१/२०११ ला प. पू. आचार्य बजरंगदासजी महाराज, हनुमान गढी नैमिषारण्य (लखनौ) यांची उपस्थिती मिळाली. त्यांच्या अमृतमय वाणीतून त्यांनी आशीर्वचन पर सत्संग घडविला. तसेच त्याच रात्री प्रत्यक्ष विवाह सोहळा ज्ञान मंडपात पार पडला.

अशा या भव्य कार्यक्रमात विशेष तरुण, तरुणी, लहान बालकांपासून ते वृध्द आई-वडील यांची उपस्थिती मिळाली. प. पू. आचार्य जनार्दन महाराज यांनी तरुण वर्गावर निर्व्यसनी राहण्यासाठी बरेच उदाहरणे दिली. सुखी जीवन जगायचे असेल तर प्रत्येकाने भगवंताची भक्ती, सत्संगाचा आनंदात सहभागी होऊन संसारात सत्कार्य करावे.

शेवटच्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन संपूर्ण गावाकरीता करण्यात आले होते. सायंकाळी ५ वाजेला दिंडी सोहळ्यात अभंग, भजन, टिपऱ्या, गरबा व सद्गुरु बँड पार्टी यांच्या भजनाच्या आनंदाने दिंडी सोहळा पार पडला. सात दिवसाच्या या कार्यक्रमात सत्पंथ युवक मंडळ व ग्रामस्थ तरुण मित्र मंडळ यांनी सहकार्य करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

'विषयाचा मधुबिंदू जीवा लोटी दुःख सिंधू'

श्री. महादेव साने
मलकापूर, ता. कऱ्हाड

कृष्णा काठी वसलेले सांगली गाव. सांगली संस्थान होय. ह्या सांगली गावाने देश परदेश पातळीवरील साहित्य संगीत कला क्षेत्रातली परमभूषण रत्ने दिली. मग ते नाट्य संगीत असो वाद्य संगीत असो, चित्रकला किंवा स्थापत्य, राजकारण किंवा समाजकारण अगदी अर्थकारणातही इथे कार्य करणारी मंडळी होऊन गेली. त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या कार्याचा ठसा समाज मनावर आजही आहे. कीर्तन परंपरा तर इथली रुजलेली कला. जिने समाजाला सोपा नामारुपातला भक्तीमार्ग दिला. सांगलीच्या कीर्तन परंपरेचे दोन अर्ध्वयु म्हणजे तात्यासाहेब कोटणीस महाराज आणि ह.भ.प. मामा महाराज केळकर. कै. ह.भ.प. मामा महाराज उर्फ गोविंद अनंत केळकर हे सतपुरुष अखंड कीर्तन रंगी रंगलेले असत. प्रपंच की परमार्थ अशा द्विधा अवस्थेत असणारे मामा आळंदीस गेले. तिथे त्यांनी ज्ञानोबा माऊली पुढे धरणे धरले. माऊलींनी दिव्य संदेश दिला तव प्रपंच हाच परमार्थ । होईल निधरि सार्थ । जगा दाखवी तत्वार्थ । वदे माऊली प्रेमभरे ।। प्रपंच परमार्थमय असावा मात्र प्रपंच कर्तव्ये परमार्थ भावनेने पार पाडावीत. नेमकी हीच गोष्ट पूज्य मामा महाराजांनी सांभाळली. मात्र रामनाम स्मरण कधीही सोडले नाही. अखंड कीर्तन सेवेतून समाजाला प्रबोधन जीवनभर करीत राहीले. जसे कृष्णेचे जल तृषार्तांना शांत करते तसेच ह्या कृष्णाकाठीच्या संताने प्रपंच आणि परमार्थ एकरुपतेने अनुभवले. ज्यातून येणारा अनुयायी तृप्त तृप्त शांत आणि विकल्प शून्य झाला.

पूज्य महाराजांची ग्रंथ संपदाही मोठी आहे. श्री हनुमद् गुरुचरित्र बोधसार, श्रीराम पाठ, अभंग गाथा, त्रयोदशाध्यायी श्री गुरु चरित्र, मात्र नाममय झालेल्या नामातच रंगलेल्या समर्पण भावनेने नामकीर्तनी रंगलेल्या ह्या सतपुरुषाने सामान्य जनांना आपल्या अमृतवाणी ह्या अभंग गाथेतून अगदी सोपा बोध केला आहे. हे अभंग वाचताना तुकोबारायांच्या अभंग गाथेची आठवण होते. अवघे जीवन म्हणजे नाम-जप यज्ञ ठरलेले मग 'भाव तिथे देव कां न भेटला'. नाथ महाराजांना ज्ञानेश्वर माऊलींनी 'हरिपाठ' देवून दर्शन दिले. तसाच प्रकार पू. मामा महाराजांचे बाबतही घडला. तीव्र ईच्छाशक्तीतून त्यांनाही माऊलीचे दर्शन घडले. तो सोहळा अनुभवताना मामांनी त्या दिव्य साक्षात्काराचे रेखाचित्र काढले. आजही ते आपल्याला श्रीमामा महाराज केळकर राममंदिरात सांगली येथे देवळाच्या गाभाऱ्यात पहायला मिळते. त्या दर्शनाचे वर्णन पूज्य मामा महाराज असे करतात-

कपायांवर पादुकाहि चरणी मंदील श्रीमस्तकी ।
कर्णी कुंडल ती गळ्यात झळके रुद्राक्षमाळा निकी ।।
हातामाजि कमंडलू नि बरवा शोभे भला दंड तो ।
गोविंदा पुढती प्रकाशरुप जे त्या ज्ञानिया वंदितो ।।

'अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग' ह्या संत सोयराबाईंच्या अभंगाप्रमाणे पूज्य मामा महाराज अखंड कीर्तन रंगी रंगले होते. आपल्या आयुष्यातली सारी दुःखें विसरून प्रपंच चिंता विसर्जीत करुन, सारे अवगुणरिपु रामार्पण भावनेने नामात विरघळवून, असहाय्य आणि असह्य व्याधींनाही विसरून मामा रंगले ते मन हो राम रंगी रंगले । चरणी नेत्र गुंतले अशा रामनाम रंगी ।। त्यांची कीर्तनाची एक ठराविक वेळ असे ती त्यांनी आयुष्यभरात अगदी शेवटच्या घटकेपर्यंत पाळली. एवढेच नव्हे तर भजन वेळ होईपर्यंत रामनाम संकीर्तन होईपर्यंत साक्षात् मृत्यूलाही थोपवले. जी गोष्ट आजच्या वैद्यक

ॐ नमो निष्कलंकी नारायण जनार्दनाय। भस्मायुधाय विद्महे। दिव्यनेत्राय धीमहि। तन्नोज्वहरः प्रचोदयात्।। ॐ शांतिः शांतिः शांतिः

शास्त्रात केवळ अशक्यच वाटते अनेक दुर्धर व्याधींनी शरीर मरणासन्न झालेले, सकाळपासून नाड्या सुटत चालेल्या. डॉक्टरांची उपचाराची शर्थ चाललेली. देह निपचित झालेला. डॉक्टरांनी तर स्पष्ट सांगितले की दुपारी पर्यंतही मामा आपल्यात राहत नाहीत. पण जीवाची शिवरुपाशी लागलेली ओढ नित्याचा कीर्तनाचा आयुष्यभर जपलेला परिपाठ आज काही शक्य नाही असे वाटून सारे हतबुध्द झालेले. घड्याळ्यात संध्याकाळचे पाचचे ठोके पडले आणि प्रचंड इच्छाशक्ती असणारा हा सत्पुरुष क्षणात शुध्दीवर आला मुखातून नित्याच्या कीर्तनाला श्रीराम जय राम जय जय राम हा नामोच्चार झाला अन् पुढल्या क्षणी मान टाकली. आत्मा देह सोडून रामचरणी विलीन झाला. असे हे सांगलीचे सत्पुरुष मामा महाराज केळकर अखंड कीर्तन योगी सत्पुरुष.

असे हे पूज्य मामा महाराज केळकर ज्यांनी आपल्या कीर्तनातून उत्स्फुर्तपणे अभंग सादर केले आणि त्यावर निरुपण केले रोजचा विषय निराळा असला तरी कीर्तनाचा गाभा '**नाम पुण्य नाम सुख । नामे पावे उत्तम लोक। नाम अचुक साधन। नामे जोडे नारायण।**' असा आहे. सारे अभंग 'अमृतवाणी' ह्या ग्रंथात एकात्रित केलेले आहेत. ह्या गाथेत सद्गुरुपर, सण पर्वकाळ, मन, उपदेश, भक्ती, नामस्मरण, साधन, साधक, देव, अनुभव, संतपर, पौराणिक, संसार, रामपाठ असे विविध विषय आले आहेत. राम पाठ वाचताना वारकरी सांप्रदायाच्या हरिपाठाची आठवण होते.

देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य ।
झालिया दर्शन मुक्ती लाहे ।
रामपाठ करी रामपाठ करी ।
पुण्याची हे थोरी वर्णवेना ।।१२३८।।

अभक्ताचे लाजिरवाणे जिणे जगण्यापेक्षा रामनाम स्मरण चिंतनातून जीवन समृध्द संप्रक्त करा 'रामनाम ज्ञान, रामनाम धन, रामनामी जाण, सर्व काही' हे ओळखा. 'हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा पुण्याची गणना कोण करी' हा हरिपाठातलाच विचार रामपाठात मांडलेला आहे. सद्गुरु तर आपल्याला परमार्थ मार्गातला मार्गदर्शक असतो. 'गुरुविण कोण दाखविल वाट' हा भाव एका विशिष्ठ क्षणी एखाद्या जीवन मरणाच्या प्रसंगी आपण अनुभवतो. तिथे ना कोणी आधार ना कोणी उदार तिथे तर असतो सर्वत्र अंधार ह्या अंधारात चाचपडणारा जीव प्रापंचिक सुखाच्या मृगजळाला भुलतो. इथे एक क्षण असा येतो की, जीव व्याकुळ होतो, तळमळतो, हा क्षण असतो आर्त भक्तीचा. मोह सरून उरतो तो शुध्द भाव तिथे भेटणारा गुरु ठरतो सद्गुरु जो जीवाला लौकिकापारचे सुख कोणते ते समजावतो. ह्या क्षणी आर्ताची अवस्था विचित्र असते.

मोहिले अंतर मायेने सकळ ।
चित्ता तळमळ होय सदा ।।
काही सुचेचिना देवाजीचे नाम ।
सदा राहे काम अंतरात ।।
दास म्हणे काढी मायेची मोहिनी ।
आपुली घालोनी गुरुराया ।।

संसार म्हणजे जिथे जीवाला आणखी हवे आणखी हवे ही लौकिक सुखाची बाधा होते. प्रपंचातली धन दारा मान कीर्ति ह्या तीन गोष्टींची चटक मनुष्याला लागली की सुखाचे सुख स्त्रीमुखच वाटू लागते. ऐरवाने लबडबडलेल्या किड्यांना ऐरवातली क्रिडाच सुखाची वाटते. क्षणाचे सुख पुढे मणाचे दुःख घेऊन येते हे आपण विसरतो. मग ह्यावर उपाय असा -

संसाराचा भक्त झाला । आणा सरेना तयाला ।।
नाम लक्षणाने युक्त । होई खरा हरिभक्त ।।
करी देवाजीची भक्ति । देव चिंता वाहे चित्ती ।।
दास म्हणे देव देणे । वर्णवेना कोटी गुणे ।।१९४।।

विषय सुखात रमलेल्या जीवांची अवस्था मोठी विचित्र

होते. विषय सुख हे खरे सुख नाही तर ते अंती दु:खदायकच आहे हे कळले तरी वळत नाही. जसे एखाद्या शरीराला झालेल्या जखमेला कंड सुटते तिथे खाजविल्यास जखम चिघळेल आणि ती शरीरपीडा ठरेल हे कळाले तरी क्षणभर तिथे खाजवून मिळणाऱ्या सुखाचा मोह काही आवरत नाही. प्रपंच कर्तव्यातली विषय लोलुपता ही अगदी अशीच आहे जसे-

विषयाचा मधुबिंदू । जीवा लोटी दुःख सिंधू ।।
विषय सुख येथे गोडू । परी परिणामी कडू ।।
मोह त्याचा आवरिता । देव त्याची वाहे चिंता ।।
माजी सुटायचे कोड । दासा नामाची सांगड ।।१८३।।

मी म्हणजे कोण? मी माझा परिचय देतो ते नाव, पित्याचे आडनाव, नाव, गांव, पति, पुत्र, पिता, बंधू, अमुक गावचा, अमुक ठिकाणी अधिकारी, तमुक व्यावसायिक अशा अनेक मार्गांनी. कारण माझी समाजाला आणि माझी मलाही अंशाच रुपातली ओळख असते. तिथे मी म्हणजे अहंकार, क्रोध, मत्सर, काम ह्या साऱ्यांनी व्यापलेला आणि देहरुपातच मनाने विचार करणारा क्षण जीव म्हणजे पाण्यावरचा देहरुप बुडबुडा. माझी मला ओळख असते ती येवढीच मर्यादित देहरुपातली. पण देहरुपातला मी मर्त्य आहे तर आत्म रुपातला मी आपण कधीच ओळखत नाही. ह्या 'मी' ला समर्थ आत्माराम संबोधतात. म्हणून संत म्हणतात-

नरदेही होई जागा । रामनामी राही उगा ।।
जागेपणाचे लक्षण । देही रामनाम खूण ।।
तेथे ठेवोनिया मन । तया माजी होई लीन ।।
दास म्हणे सांगो किती । देही देवाची प्रचिती ।।२२०।।

देही देवाची प्रचिती येणे म्हणजे मी ब्रह्मरुप आहे हे पटणे मग तिथे मी चा अहंकार संपतो. उरतो शुद्ध भाव जो प्रगट होतो. प्रपंच ममत्वाकडून रामरुपी समत्व येते. सर्वांठायी समबुध्दी म्हणजे 'जे जे भेटे भूत ते ते मानी भगवंत' किंवा भूतांची दया हे भांडवल संतां' हा भाव स्वला देहापार लौकिकापर नेतो. मात्र माणसाचे मन म्हणजे चंचलतेचा नमुना असते त्याची गती वृत्ती अजब असते.' आता होतं भूईवर गेलं गेलं आभायात 'असं हे मन. हे मन भल्या भल्यांना विचलित करते. हे उभ्या पिकातलं ओढाळ गुरढोर लयी वाईट बगा. मग ह्या मनाला सन्मार्गाला लावायचा उपाय काय? तर तो हा-

हेच जाणावे नमन । मन करावे अधीन ।।
मना अधीन जो झाला । सर्व दुःखे प्राप्त त्याला ।।
गोविंद म्हणे मन । नामी करावे उन्मन ।।२३८।।

बध्दाचे लक्षण पहा-

बध्दाचे लक्षण । नेणे बांधलो आपण ।।
आशा जीवासी बंधन । तोडू शके नारायण ।।
संकल्पाने जो बांधला । कैचा म्हणावा मोकळा ।।
जन्म मरण बद्धपण । नाम चुकवी दास म्हणे ।।३४७।।

'धन्य धन्य हा नरदेह' म्हणून समर्थ नरदेहाचे सार्थक कशात आहे हे सांगतात. ते म्हणजे 'देही देव शोधावा मग भेदा नुरे ठाव' मात्र आपले जगणे कसे असते? तर आला आला प्राणी जन्मासी आला, गेला गेला बापुडा व्यर्थाचे गेला' पूज्य मामा महाराज नर देहाचे महत्त्व सांगतात-

देह असती अनेक । नर देह सर्वाधिक ।।
नरदेही बसूनि पाही । देवा समाधान होई ।।
गोविंद म्हणे हा लाधला । उपयोग करी भला ।।११९४।।

पूज्य मामा महाराज केळकर त्यांचा हा अल्पसा परिचय आहे. पूज्य मामांच्या सहित्य व्यक्तिमत्वाचा बोध म्हणजे **'जो रामनामी रंगला जीव । तोचि झाला रूपे शिव'**

*** सुविचार ***

आपल्या आनंदी स्वभावामुळेच इतर जीवही आनंदी होतात.

श्रध्दा

श्रीश माधव चिपळोणकर
के. नारखेडे विद्यालय, भुसावळ

जीवन म्हणजे काय? विषाची परीक्षा की अमृताची माधुरी? काट्यांची बोचरी वाट की फुलपाकळ्यांची पखरण? कर्तृत्वासाठी दिलेले मुक्तांगण की प्रतिकूल परिस्थितीला शरणागती? असे अनेक अनुत्तरीत प्रश्न आपण स्वत: अनेकदा विचारतो आणि मग उत्तर न सापडल्याने अस्वस्थ होतो. पाण्यावर पडलेल्या कसपटासमान लाटेबरोबर वाहत जाणे कुणालाही आवडत नाही. जीवनात स्थैर्य, आधार व आदर्शाचे मापदंड शोधण्याचा प्रत्येकाचा आपापल्या परीने प्रयत्न सुरु असतो. अशा या प्रयत्नात जेथे या गोष्टी गवसल्याची जाणीव होते ती जाणीव म्हणजेच 'श्रध्दा' असे व्यावहारिक उत्तर 'श्रध्दा' म्हणजे काय हे विचाल्यावर देता येईल.

मग 'श्रध्दा' ही एक स्वैर व स्वसंवेध जाणीव आहे का? असे विचाल्यास 'श्रध्दा स्वसंवेध जरुर आहे पण स्वैर नाही असे जाणवते. कुणी म्हणेल 'दैत्यगुरु शुक्राचार्यांवर राक्षसांची 'श्रध्दा' च नव्हती का? तर आधुनिक जगात धर्माच्या नावाखाली होत असलेल्या आतंकी कारवाया ही 'श्रध्दांच म्हणायची का? इ. परंतु मुळातच स्थैर्य, आधार व आदर्शाचे मापदंड शोधतांना केवळ स्वार्थाचा विचार जर होत असेल 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' तो विचार जर नसेल तर तो श्रध्देचा जनक होऊ शकत नाही.

याचबरोबर अज्ञानातून ठेवलेली श्रध्दा ही देखील योग्य म्हणविली जात नाही. गुप्तधनाच्या प्राप्तीसाठी निष्पापांचा बळी घेणे आजारावर औषधोपचार सोडून देवाजवळ नवस, कर्मकांड इ. करणे ही सुध्दा 'श्रध्दा' नसून अंधश्रध्दा आहे. यात स्वार्थाबरोबरच अज्ञानही असते.

या उलट 'स्व' त्वाला दुय्यम ठेवून किंव्हा 'अहम्' बाजुला सारून समष्टीच्या कल्याणासाठी ज्यांनी जीवनात स्थैर, आधार व आदर्शाचे मापदंड शोधले ते सश्रध्द म्हणविले गेले ते निवृत्तीनाथांवर श्रध्दा ठेवणारे ज्ञानदेव असतील, ते माणुसकीवर श्रध्दा ठेवणारे बाबा आमटे असतील, समाजाला देव मानून समाजमनाची स्वच्छता करणारे गाडगे महाराज असतील. यांनी जीवनातील अमृताची माधुरी व कर्तुत्वाचे मुक्तांगण अनुभवले. सर्वसामान्य अशा तुम्हा-आम्हांला जर हे अनुभवता यावे असे वाटत असेल तर 'श्रध्दा' हेच तत्व उपयुक्त ठरणार आहे. 'मला भौतिक सुख मिळावे' या तुच्छ भावनेने केलेले सर्वच पूजाप्रपंच म्हणजे 'पापच' ठरेल.

अशा प्रकारे 'श्रध्देचे नीट विश्लेषण केल्यास ती मूर्तीत, माणसात, कागदात नसून तत्वात व विचारात 'अहम' वगळल्याशिवाय असूच शकत नाही हे मान्य होते.

* सुविचार *

जे लोक सुख मिळविण्यासाठी कशाच्याही मागे पळत सुटत नाहीत,
त्यांच्यामागे 'माझ्या स्वीकार करा हो' असे म्हणत सुख मागे धावत असते.

*****

जो मुळातच सद्गुणी असतो, त्याच्यावर दुर्गुणांचा काहीही परिणाम होत नाही.

*****

ध्येय न ठेवता शिक्षण घेणं म्हणजे नेम न धरता गोळी मारण्यासारखं आहे.

सन २०११ मधील सत्पंथातील महत्त्वाचे सण/दिवस

ज्यो. श्री. मोहन महाजन
कंडारी

१) चंद्रदर्शन वेळ - रात्री ७.१८ पर्यंत	दि. ५/१/२०११
२) वर्धापन दिन - देलवाडा, गुजराथ	दि. ३/२/२०११
३) चंद्रदर्शन वेळ - रात्री ७.४४ पर्यंत	दि. ४/२/२०११
४) वर्धापन दिन - भिमपोर	दि. १८/२/२०११
५) चापोरा महोत्सव - महाशिवरात्री	दि. २/३/२०११
६) चंद्रदर्शन वेळ - रात्री ८.२३ पर्यंत	दि. ६/३/२०११
७) चंद्रदर्शन वेळ - रात्री ८.२८ पर्यंत	दि. ५/४/२०११
८) वर्धापन दिन - उटखेडा, ता. रावेर	दि. २६/४/२०११
९) चंद्रदर्शन वेळ - रात्री ८.०८ पर्यंत	दि. ४/५/२०११
१०) चंद्रदर्शन - रात्री ८.४२ पर्यंत	दि. ३/६/२०११
११) वर्धापन दिन - खाटावाड, गुजराथ	दि. ८/६/२०११
१२) चंद्रदर्शन वेळ - रात्री ८.१६ पर्यंत	दि. २/७/२०११
१३) प. पू. ब्र. पुरुषोत्तम महाराज पुण्यतिथी फैजपूर	दि. २७/७/२०११
१४) चंद्रदर्शन वेळ - रात्री ८.१६ पर्यंत	दि. १/८/२०११
१५) वर्धापन दिन - खडका, ता. भुसावळ	दि. २४/८/२०११
१६) चंद्रदर्शन वेळ - रात्री ७.४५ पर्यंत	दि. ३०/८/२०११
१७) चंद्रदर्शन वेळ - सायं. ७.०७ पर्यंत	दि. २८/९/२०११
१८) वर्धापन दिन - धानोरा, ता. चोपडा	दि. २८/९/२०११
१९) देवर्षी करसनदासजी महाराज पुण्यतिथी, पीराणा (गुजराथ)	दि. ११/१०/२०११
२०) वर्धापन दिन - जळगाव, जि. जळगाव	दि. २०/१०/२०११
२१) चंद्रदर्शन वेळ - सायं. ७.१२ पर्यंत	दि. २८/१०/२०११
२२) चंद्रदर्शन वेळ - सायं. ७.१३ पर्यंत	दि. २६/११/२०११
२३) वर्धापन दिन - डुंमस	दि. १०/११/२०११
२४) वर्धापन दिन - अठूवा निष्कलंकी धाम, सुरत बोडामुखी	दि. १०/१२/२०११
२५) वर्धापन दिन - कंडारी, ता. भुसावळ	दि. १२/१२/२०११
२६) संतश्री जगन्नाथ महाराज पुण्यतिथी महापुजा, फैजपूर	दि. १३/१२/२०११
२७) संतश्री जगन्नाथ महाराज पुण्यतिथी महोत्सव, फैजपूर	दि. १४/१२/२०११
२८) चंद्रदर्शन वेळ - सायं. ६.५७ पर्यंत	दि. २५/१२/२०११
२९) वर्धापन दिन - राजोरे, ता. यावल	दि. २५/१२/२०११
३०) वर्धापन दिन - काहूरखेडे	दि. २७/१२/२०११

ॐ नमो निष्कलंकी नारायण जनार्दनाय। भस्मायुधाय विद्महे। दिव्यनेत्राय धीमहि। तन्नोज्वहर: प्रचोदयात्।। ॐ शांति: शांति: शांति:



प.पू. संतश्री मुरारजी बापू समवेत पूज्यश्री

नवम पुण्यतिथी महोत्सवनिमित्त आयोजित कथा सप्ताह दरम्यान कीर्तन करताना ह.भ.प. मुक्ता उपासनी

वृंदांवन धाम पाल येथील कार्यक्रमात पूज्य संत ऋतुभंरा दीदी समवेत पूज्यश्री

धानोरा येथील श्रीमद् दशावतार कथा प्रसंगी मार्गदर्शन करताना पूज्य व उपस्थित भाविक



धानोरा येथील
संगीतमय श्रीमद् दशावतार कथा सप्ताह
विविध क्षणचित्रे